जे ९५

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
गणित-ज्योतिष

संग्रहालय क्रमांक
९५
३५०

लेखक साटे गणेश नाबाजी

मन
८५७

पुस्तकाचें नांव अनुक्रमणिका- बांधर
वाहेवाटीविषयी नगदी व मूळ

म. ग्रं. सं. ठाणे
विषय गणित ज्योतिष
सं. नं. १५०


# अनुक्रमणिका.

पृष्ठ.

## नगदीसंबंधी.

१ नगदीसंबंधीं नमुने कोणते. ------- १



## कीर्दवही.

२ अव्वल आढाव्या प्रकरणीं. ------- १०

३ शिलके प्रकरणीं. ........ १३

४ वसुला प्रकरणीं. ------- १४

५ रवानगी प्रकरणीं. ------- १५

१ निशाण–क. ------- २०

१ निशाण–ख. ------- २१

६ शिवायजमाखर्च. ------- २५

७ जमाबंदी प्रकरणीं. ------- ३२

८ इतर प्रश्नोत्तरें. ------- ३५



## खतावणीवही.

९ गांवचे वहिवाटी विषयीं खातीं कशीं आहे विषयीं ------- १५५

१० सरकार खात्या प्रकरणीं. ------

११ कुळांचे खात्या प्रकरणीं. ---------- ५३
१२ खानगी खात्याविषयीं. ---------- ६३
१३ गांवनिसबत खर्च व इनामदार यांचें इसमवार
या विषयीं. .................................. ६४
१४ इनाम जप्ती विषयीं. ---------- ७०
१५ पावतीप्रकरणीं. ---------- ७३
१६ नमुने नंबर ५।६।१२ मिळून तीन वसूलबाक्या
संबंधीं. ---------- ७६
१७ नमुना नंबर २२ (ह्मणजे) सरसालचे वसूल बाकी
विषयीं. .................................. ८१
१८ अखेर आढाव्या विषयीं. .................. ८३

# मुलकीसंबंधीं.
# प्रतबंदी कायदे.

तीस कलमांचे प्रतबंदी कायद्या विषयीं. --- ८७
साहेब यांणीं १९ कलमांची रूक ठराविली
रणीं. ---------- १०६

# मुलकीनमुने. ग्रा२८५।१९५

२१ मुलकी संबंधी नमुने किती व कोणते. ........ ११७
२२ शेतवार पत्रक नमुना नंबर एक या प्रकरणीं. ११८
२३ लावणी कमज्यास्ती टिपण नमुनानंबर ७ याविषयीं १२१
२४ नमुनानंबर ८ गवतीजमीनीचें पत्रक याविषयीं. १२५
२५ लावणी पडीचें पाहाणी पत्रक नमुनानंबर ९ प्रकरणीं. १२६
२६ लावणी पत्रक नमुना नंबर १० दाह्मा विषयीं. १३२
२७ नमुना नंबर ११।१२ याविषयीं. ......... १३४
२८ नमुनानंबर १४ कुळवार जमाबंदी कमज्यास्ती पत्रक या विषयीं. ................ १३६
२९ सरसालच्याजमाबंदी ठराव बंद याविषयीं. १३८
३० नमुनानंबर १६ या विषयीं. १४७
३१ नमुने नंबर १७।१८।१९ या विषयीं. .... १४७
३२ कोण कोणते नमुने कोठें राहावयाचे त्याचें—तेरीज. ..................... १४७
• शुद्धीपत्र. .................... १५२
• शब्दपरिभाषा. .................. १५५

# प्रस्तावना.

इंग्रज सरकारचा अंमल हिंदुस्थानांत झाल्यापासून राज्याची व्यवस्था चांगल्या प्रकारें चालावी; ह्मणून अनेक प्रकारचीं खातीं, त्यांचे अधिकार व त्यांचीं कामें या विषयींचे निरनिराळे ठराव करून एकसारखी पद्धत सरकारानें ठेविली आहे. त्यांत रयतेपासून कर किंवा स्वामित्व कसें घ्यावें व त्याचे काळ किंवा मुदती कशा असाव्या आणि तो सर्व वसूल वेळचे वेळीं घेऊन त्याचा खर्च कोणत्या रितीनें व कोठें कोठें करावा याचा हिशेब ठेवणें हें मुख्य खातें ह्मटलें तरी चालेल. तस्या खात्याची माहितगारी जे कोणी सरकारची नौकरी करण्यास इच्छित असतील त्यांस किंवा ज्या सरकारच्या नौकरांस सरकारचें सदर हू हिशेबी काम बराबर आपल्या हातून व्हावें आणि आपण टपक्यांत नयावें अशी उमेद असेल त्यांस उपयोग व्हावा ह्मणून आह्मीं हें पुस्तक तयार केलें आहे.

सरकारचे या खात्यास नगदी मुलकी खातें असें नांव लोकांच्या परिपाठांत आहे, त्याच्या तीन पायऱ्या आहेत. पहिली गांवासंबंधी, दुसरी तालुका व पेटा आणि तिसरी हुजूर किंवा जिल्हा. गांवांतील वसूल किंवा पट्टी उत्पन्न झाल्यावर तालुक्यास जमा होते. तालुक्याहून हुजुरास होते. तेव्हां तिन्ही ठिकाणीं हिसाब व जमाखर्च कसे करावे

व यांच्या वहिवाटी कशा आहेत हें समजण्याकरितां अवश्य ग्रंथ पाहिजेत. सरकारानें गांवचे व तालुक्याचे जमाखर्चांची माहिती नौकरांस व उमेदवारांस व्हावी सबब वह्या छापून प्रसिद्ध केल्या आहेत; त्यांचा उपयोग किती आहे याचा त्यांतील दर्दी किंवा उमेदवार लोक यांच्या लक्षांत येईल; परंतु त्या एवढ्या वह्यांवरूनच पूर्ण माहिती होईल असें म्हणवत नाहीं, कारण नमुने झाल्यावर वहिवाटी कांहीं कांहीं फिरल्या आहेत. दुसरें वह्या पाहिल्यानें खातीं किती व जमाखर्च कसे करावे याची मात्र माहिती परिश्रम केला असतां चांगली होईल. परंतु त्यांत कित्येक ठिकाणीं माहितीव कारणें यांचा स्पष्ट बोध होणें अवघड आहे. यास्तव आम्हीं हा ग्रंथ सवाल, जबाब या रूपानें केला आहे यांत अवश्य आणि उपयोगाची माहिती व्हावी असे निवडक सवाल व जबाब घातले आहेत. त्यांत नमुने व शिवाय वहिवाटी या सर्वांचें मनन करून स्पष्ट रितीनें उल्लेख केला आहे. गांवचे नगदी मुलुखी वहिवाटी संबंधी पहिला भाग छापून तयार केला आहे. तालुक्या संबंधी भाग दुसरा आणि हुजुराकडील भाग तिसरा अशीं तीन पुस्तकें तयार केलीं आहेत. हीं पुस्तकें नगदी व मुलखीचे वहिवाटी विषयीं माहितगारी करून घेऊन परीक्षा देण्यास जे उमेदवार तयार असतील त्यांस फारच उपयोगी आहेत. सरकारी शा-

कांतील विद्यार्थी यांचा अभ्यास करतील तर त्यांसही या पुस्तका चा उपयोग आहे.

सदरहू पुस्तकें आह्मी येथील या जमाखर्चांचे व सरकारी हिशोबी कामांत पूर्ण वाकबगार जे आहेत व याच खात्यांत सरकारची ह्या कामें चालवितात त्यांस दाखविलीं त्यांणीं छापून प्रसिद्ध करण्याची मान्यता दिल्यावरून हें छापविलें आहे.

---

## सूचना.

उमेदवार लोकांनीं गांवची व तालुक्याची या दोन्ही वह्यांची चांगली समजूत करून घ्यावी. नंतर या पुस्तकांतील सवाल वाचून स्वकल्पनेनें जबाब योजावा. त्यास आणि पुस्तकांत लिहिलेल्या जबाबास फरक पाहात जावा म्हणजे मनन अधिक होऊन समजूत व माहिती त्यांस चांगली होत जाईल.

# गांवच्येवहिवाटीविषयींनगदीवमुलखी यांचीप्रश्नोत्तरावली.

## नगदीप्रकरणीं.

### अंक १

**सवाल**— गांवचे वहिवाटीविषयीं ठरविले ते नमुने किती? त्यांपैकीं नगदी संबंधी कोणते?

**जबाब**— एकंदर बावीस पैकीं नगदीप्रकरणीं९ त्यांचीं नांवें खालीं लिहिल्याप्रमाणें.

१ रोजकीर्दवहीनंबर२*
१ खातेवही.नंबर.३
१ कुळाचीपावतीनंबर४
१ सालवारबाकीचेंवसूल बाकीपत्रकनंबर.५
१ तगाईबाकीचेंवसूल बाकीपत्रकनंबर.६
१ चालत्यासालच्येहप्त्याबद्दल चीवसूलबाकीनंबर१२
१ गांवखर्चसंबंधीजिन्नसघे तल्याचीनोंदणीनंबर२०
१ गांवखर्चाचीपावतीनंबर२१
१ सरसालचीवसूलबाकी नंबर २२

९ एकंदरनमुने ९ असत.

---

* सदरहूनंबर,रिविन्यूखात्याकडेछापलेलेनमुन्यांतीलनंबरअसत.

सवाल— सदरीं नमुने दाखविले, त्यांतील कोणते नमुन्यांचा काय उपयोग ?

जबाब— रिविन्यूसाहेब यांणीं नमुने ठराविले, त्याचे आरंभीं फेरिस्त लिहिलें आहे त्यांत नमुन्यांचे उपयोग कसकसे आहेत याबाबें लिहिलें आहे त्यावरून समजावें.

## कीर्दवहीबद्दल.

## अंक २

## अवल आढाव्याप्रकरणी.

सवाल— कीर्दीचे अवलीस काय असतें? त्याचें नांव काय? व त्यांत काय समजतें ?

जबाब— कीर्दीचे अवलीस अवल आढावा असतो, त्यांत मागील सालअखेर राहिलेलं देणें घेणें समजतें.

सवाल— अवल आढावा कोणकोणत्या कागदावरून उतरतात ?

जबाब— अवल आढावा मागील सालचे अखेर आढाव्यावरून उतरतात.

**सवाल**— अवल आदाव्यास देणें येणें कितीप्रकारचें, व कसें असतें?

**जबाब**— देणें व येणें असतें, तें खालीं लिहिल्याप्रमाणें.

| जमा रुपये. | रुपये. |
|---|---|
| देणें. | येणें. |
| १ सरकारचें देणें कुळवारीकडून येण्याबद्दल. | १ कुळाकडून मुलखीबाकीवतगाई सरकारचें देण्याकरितां येणेंती. |
| १ कुळाचें देणें फाजिलाबद्दल सरकाराकडून येणेंतें. | १ सरकारांतून कुळाचे फाजिलाबद्दल येणेंतें. |

येणेंप्रमाणें दोन प्रकारचें देणें व येणें असतें..

**सवाल**— अवल आदाव्यास आणि अखेर आदाव्यास काय फरक असतो?

**जबाब**— अखेर आदाव्यास देणें खर्चीकडे, व येणें जमेकडे व अवल आदाव्यास देणें जमेकडे व येणें खर्चीकडे. असाच फरक असून बेरजा कमज्यास्ती नसतात.

**सवाल**— अखेर आढाव्यास देणें खर्चीकडे, व येणें जमेकडे, व अवल आढाव्यास येणें खर्चीकडे, व देणें जमेकडे, असा फरक असण्याचें कारण काय?

**जबाब**— अखेर आढाव्यास येण्याची रकम नांवेकडे, व देण्याची रकम जमेकडे नेली असतां, खातें बराबर कधींही मिळणार नाहीं यास्तव तोंड मिळवणी करितांच जमेकडे येणें, व नांवेकडे देणें, असें काढावें लागतें. व त्याप्रमाणेंच अवल आढावा उतरावा, तर जें लोकांकडून येणें उतरलें; तें त्यांचे नांवे, व देणें जमेस असलेंच पाहिजे. तसें होत नाहीं. यास्तव सदरहू प्रमाणें अवल व अखेर आढावा फरकानें उतरावा लागतो.

**सवाल**— अव्वल आढाव्यांत, एकांच खात्यास देणें व येणें निघतें कीं नाहीं? असल्यास कसें निघतें व खातें कोणचें?

**जबाब**— मुलकी बाकी, व तगाई बद्दल देणें, व फाजिलाचें येणें, त्याप्रमाणें सरकार खात्यांत येतें.

**सवाल**— सरकार खात्याप्रमाणें, दुसरे कोणतेही खात्यांत, देणें व येणें येईल कीं नाहीं?

**जबाब**— कुळाचे खात्यांत. तगाई हप्ता भरण्यास्तव बाकी राहिली ती, व जमीन बाबे बद्दल फाजील झालें असतां

देणें. येणेप्रमाणें प्रकार कुळाचेहीखात्यांत येईल. (पण क्वचित.)

## अंक. २
## शिलकेप्रकरणीं.

**सवाल—** कीर्दीस रकम असून ती खतावणींत येत नाहीं. अशी रकम कोणची?

**जबाब—** दररोज अवल अखेर शिलक खतावणीस येत नाहीं.

**सवाल—** कीर्दीबरहुकूम खतावणी असते कीं नाहीं? असल्यास कधी? कशी? व नसल्यास कशी?

**जबाब—** कीर्दीबरहुकूम खतावणी सालचे अवलतारखेस जमेकडील, व अखेरतारखेस खर्चीकडील असते. दरम्यान कधींही शिलकेचे कारणानें नसते. ह्मणजे शिलक खेरीजकरून असते.

सदरहू सवालजबाब गांवचे वहिवाटीस लागू नाहींत; कारण तेथें शिलक राहत नाहीं. परंतु समजुतीस्तव एथें लि

लिहिलें आहे.

सवाल— गांवीं महिना अखेर शिलक न ठेव ण्याचा हेतू काय?

जबाब— महिना अखेरीस वसुलाची शिलक ठे विली असतां गांवचे व तालुक्यांतील महिन्याचे वसूल बाकीस फरक येईल, तो शिलक न ठेविल्यानें येणार नाहीं; परंतु ही सबब पेटे वहिवाटीचे गांवास लागू समजूं नये.

सवाल— सरकारी वसुलाची सर्व शिलक रवा ना केली असून पाटील याजपाशीं सरकारी शिलक रा हत्ये, अशी कोणची?

जबाब—चिल्हर ह्मणजे गांवखर्चापैकीं शिलक राहते.

सवाल—सदरहू शिलक राहण्याचें कारण काय?

जबाब— गांवचीं इसमें पैसा घेण्यास हजर न झाले कारणानें राहते.

## अंक ४
## वसुलाप्रकरणीं.

सवाल— कुळाकडून वसूल आला असतां कसा

जमा करावा; व त्यास सालवार बाबवार वगैरे तपशील कोणच्या आधारावरून लावावा.?

**जबाब—** कुळाचें व त्याच्या बापाचें नांव, व अड नांव, व हस्ते वगैरे सहित लिहून वसूल दिलेला सालचारी पैकीं असल्यास, त्याचे खात्यास अवल आढाव्यांत साल, व बाब वगैरे पाहून त्या प्रमाणें सालें व बाबी पुरवून पैसा जमा करावा. व सालमजकूरचा असल्यास त्याचे नांवें जमाबंदी झालेली बार असते. त्या आधारावरून तपशील लिहून जमा करावा.

**सवाल—** तारखेस वसूल सालवार बाबवार वगैरे किती आला, असें समजेल कीं नाहीं.?

**जबाब—** दर तारखेस वसूल येण्याचा पुरा झाल्या नंतर रोजमजकूरचे जमेचे बेरजेस सालवार बाबवारीचा तपशील केला असतो, तेथें सर्व समजेल.

**सवाल—** एकंदर महिन्यांत सालवार वगैरे वसूल किती आला असें समजेल कीं नाहीं.?

**जबाब—** महिना अखेरीस तारीखवार तेरीज करून त्याखालीं जमेचे बेरजेस सालवार बाबवार तपशील केला असतो तेथें सर्व समजेल.

**सवाल**— बारमाही वसूल इनामाचे नेरजे सहित सालवार नावबार वगैरे किती आला असें कोण कोणचे ठिकाणीं समजेल.?

**जबाब**— साल अखेरीस कीर्दीस बारमाही माहेवार तेरीज केलें असतें, त्याखाली सालवार नाववार वगैरे तपशील केला असतो त्यांत, व सकीर खात्यांतील खर्चीचे एकंदर बेरजेस तपशील केला असतो तेथें. याप्रमाणें दोन ठिकाणीं समजेल.

**सवाल**— दरतारखेंतील रोखजमा व परभारें भरण्याचा जमाखर्च मिळून एक बेरीज करावी. याप्रमाणेंच इतर जमाखर्चाची बेरीज करावी. अशा रकमा दोन सदरांनीं महिन्यांतील एकंदर निवडून काढिल्या असतां, रोख व परभारें भरण्याची बेरीज सरकारखात्यांतील वसुलाचे भरण्यास किंवा महिन्याचे नेरजाखालचे तपशिलांतील ऐन व नगाई सुद्धां वसुलास मिळेल कीं नाहीं व महिना अखेरीस शिलक राहिली नाहीं.

**जबाब**— रोखवसुलांत महसुली भत्ता वगैरे इतर खात्याची जमा असत्ये सबब मिळणार नाहीं.

**सवाल**— गांवीं कारकून तपासणी करितां जाऊन कुळकर्ण्यास विचारिलें कीं, आजतारखेपावेतों जमाबंदी व

तगाई पैकीं वसूल किती आला, तर कुळकरण्यानें कशा वरून सांगावें; आणि कारकुनानें कशी खातरी करून घ्यावी?

**जबाब—** सकार खात्यांत अखेरभरणा ज्या तारखेपर्यंत जाहला असेल तीचे पुढील तारखे पासोन कारकुनानें विचारले तारखे पर्यंत, कीर्दीवरून वसूल एकत्र जुळून सरकार खात्यांतील भरण्याचे बेरजांत मिळवावा. तितका वसूल आला असें समजावें.

**स०** सरसालांत गांवाबद्दल रोखवसूल सरकारांत किती पावला असें कोठें कोठें समजेल?

**ज०** सरसालचे **वसूल** बाकीचे वसुलांत सूट, वसाल मोबदला वजाजातां बाकी निघेल ती व सरकार खात्यांत नांवेकडे भरण्याचे बेरजेस तपशील असतो त्यांत सूट, साल मुबादला व इनाम वजाजातां, बाकी राहील ती.

येणें प्रमाणें दोन्ही बेरजा समान येतील तितका रोख वसूल समजावा.

**स०** गांवीं कुळकरणी चालू तारखेपर्यंत पहिले तारखेपासून वसूल एकत्र जुळीत आला, दरम्यान खानगी परत जमा झाली नव्हती, असें असून त्या रकमेची बे-

रीज सरकारखात्यांतील भरण्याचे बेरजेस मिळत नाहीं असें दिसलें, व गांवीं शिलकतरनाहीं याचें कारण काय असावें?

जः० वसुलाची रवानगी केली तिची रशीद येऊन जमाखर्च झाला नाहीं अथवा रवानगी वाटेंत आहे.

स० मागें रवानगी झाल्या तारखे पासून आज तारखे पावेतों कुळवार वसूल एकत्र जुळला असतां, ती बेरीज सरकारखात्यांतील भरण्याचे बेरजेपेक्षां ज्यास्ती येते असें कोणकोणत्या कारणानें होईल? जुळलेले वसुलाचे रकमेइतकीना शिलक नसून कम जास्ती आहे याचें कारण काय

जः० गांवीं शिलक राहिली व त्या शिवाय कुळाचा खातें मुबादला झाल्यामुळें खर्चीकडे नजर न पोंचली, त्या कारणानें एक बेरीज दुबार वसुलांत धरली गेली. यामुळें सरकार भरण्यापेक्षां ही रक्कम ज्यास्ती होईल आणि जुळलेले वसुलाइतकीच शिलक रोख नसण्याचें कारण महसुली भत्ता वगैरेची रोख जमा आली असेल असें दिसतें.

# अंक ५

## रवानगीप्रकरणीं.

स० गांवींवसूलजमल्यानंतर कायव्यवस्थाकरावी?

ज० ऐवज रवानगीखातें खर्च घालून आला हिशा अर्जेदास्त रिविन्यूकडील गांवचे वहींतील नंबर १७ चे नमुन्या प्रमाणें लिहून ऐवज तालुक्यास पाठवावा.

स० रवानगी पटून पावती आल्यावर जमाखर्च कसाकरावा? त्यास सालवार वगैरे तपशील पुरविणें तो कोणीकडे पुरवावा? जमेस किंवा खर्चीकडे?

ज० रवानगी परतजमाकरून सरकारखातें भरणा खर्च लिहून तेथें तपशील पुरवावा.

स० रवानगीखर्चीस साल वार, बाबवार व भरणा खर्चीस नाणे वार, कधीं लागेल कीं नाहीं?

ज० पाटील कुळकरणी वगैरेंसह ठाण्यास असतां कुळाचा वसूल पटला तर भरणा खर्चीस मात्र नाणेवार लागेल※ परंतु रवानगीखर्चीस सदरीं लिहिलेला तपशील कधींही लागणार.

※ पाटील कुळकरण्यासमक्ष वसूल ठाण्यास पटला तर नाणेवार लावितात अशी वहिवाट कोठे कोठे आहे ह्यासमजुतीस्तव लिहिलें; परंतु भरणा खर्चीस नाणेवार लाविले नाहींतरी हरकत नाहीं.

## निशाण- क

## रवानगीप्रकरणांतील पावतीसंबंधीं.

स० अर्जदास्तीची बारनिशी नपाहतां व तारीखवा र नजुळतां भरणाखर्चास तपशील कोणतेही कागदाव रून लावतां येईल कीं नाहीं?

ज० रवानगीपटल्यानंतर तालुक्याहून तपशील वार पावती येते त्यावरून लावतांयेईल; परंतु कदाचित साल,बाब वगैरेचा तालुक्यास चुकून मोबादला झाला, त शी पावती आली त्याप्रमाणें गांवीजमाखर्च केला असतां चूक होईल ती नहोण्यास्तव पावती आलेली बारनिशीस रुजू पाहून तपशील लावावा.

स० रुपयेपोंचल्याचीपावतीकोणते अंगास मांडली असत्ये?

ज० जमेकडे — तात्पर्य, अवल आदाव्याचे फा जिलाशिवाय जी रकम गांवीं सरकारखात्याचे खर्चीक डे ती तालुक्यातील मौज्याचे खात्यास अगर पावतींत जमे कडे, व जी रकम गांवीं सरकारखात्याचे जमेकडे, ती

मौजे व पावती यांस खर्चीकडे, येणें प्रमाणें असते.

स० गांवांतून तीन दिवस तीन खानग्या केल्या, आणि चवथे दिवशीं प्रथम खानगीची पावती दोन वाजतां, व दुसरीची तीन वाजतां, व तिसरीची चार वाजतां, येणें प्रमाणें पावत्या आल्या असतां इतके वेळां जमाखर्च करावे किंवा कसें?

ज० गांवचे पावती बूक एकच असतें सबब असें होणार नाहीं.

स० ऐवज पाठविल्या रकमेपेक्षां पावती कमी येऊं सकेल कीं नाहीं?

ज० खानगींत खोटे रुपये निघाले असतां पावती कमी येईल.

## निशाण- ख.

## खानगी प्रकरणांतील जमाखर्च-
## वहरकती वगैरे कराया विषयीं.

स० खोटे रुपये लागले कारणानें पावती कमी आल्यास जमाखर्च कसे करावे!

**ज०** पूर्वी रंचानगी खर्च लिहिलेली रकम परत जमा करून जितके रुपयांची पावती आली तितके सरकारखाते तपशीलवार भरणाखर्च लिहून बाकी लागलेले खोटे रुपये पोतदार याजकडून भरून घेण्यास्तव त्याचे नांवे खर्च ल्याहावे.

**स०** खोटे रुपये लागले कारणानें वसुलाचा भरणा लिहितेवेळेस ते रुपये कोणते एका बाबींत कमी पडले व कांहीं दिवसांनीं ते रुपये भरून घेतल्यावर त्या रुपयांस कोणत्या बाबी लावून भरणा पुरवावा, असा संशय आल्यास बाबी पुरविण्याविषयीं काय तजवीज केली पाहिजे? व असा संशय नयावा म्हणून खोटे रुपये लागले अशी पावती येतांच काय करीत जावें?

**ज०** मागें खोटे रुपये लागले तेव्हां वसूल कितीक सायेऊन भरणा कसा बाबवार पडला तो वसुलांत वजा देऊन बाकी कोणत्या बाबी पुरविणें राहिल्या हें पाहून हल्लीं खोटे रुपये भरून घेतले त्यांस बाबी पुरवाव्या आणि जेव्हां जेव्हां खोटे रुपये लागले अशी पावती येईल तेव्हांच खोटे रुपये अमुक बाबींत पुरवाव याचे राहिले

असें स्मरणार्थ टिपून ठेवीत जावे.

स० रवानगीखर्च न लिहितां प्रथमच भरणाखर्च लिहून ऐवज पाठविण्यास काय हरकत आहे?

ज० प्रथमच सरकारखाते खर्च लिहून ऐवज पाठविला, आणि तो चोरांनीं वाटेंत लुटला, वगैरे कारणानें तालुक्यास न पोंचल्यामुळें मौज्याचे खात्यांत जमा न सून गांवीं सरकारखात्यांत खर्च आहे व खोटे रुपये लागले असतां गांवीं भरणाखर्च ज्यास्ती असून मौज्याचे खात्यास जमा कमी येणेकरून दोन्ही खात्यांत फरक राहतो तो न राहण्यास्तव प्रथमच भरणाखर्च लिहून ऐवज पाठवितां येत नाहीं सबब रवानगीखर्च लिहूनच पाठविला पाहिजे.

स० वसूल आलेला रवानगीखर्च पडल्यावेगळा भरणाखर्च पडत नाहीं यास्तव सरसालांतील रवानगीची व भरण्याची बेरीज मिळेल कीं नाहीं?

ज० कुळानें परभारें भरणा केला असतां ती रकम रवानगीखात्यांत न येतां एकदम भरणाखर्च पडते सबब दोन्ही बेरजा मिळणार नाहींत.

स० सरसालांत परभारें भरणाच झाला नाहींत
र सदरहू दोन्ही बेरजा मिळतील कीं नाहीं?

ज० खोटे रुपये लागले असतां पोतदारापासून
भरून घेतल्यानंतर सदरहू रुपये पूर्वी रवानगींत गे
ले असून तेच पुनः रवानगींत खर्च लिहून जातात
या मुळें रवानगीची बेरीज भरण्यापेक्षां ज्यास्ती हो
ते सबब सदरीं सांगितलेल्या दोन बेरजा मिळणार
नाहींत.

स० सरसालांत परभारे भरणा व खोटे रुपये यां
ची हरकत आलीच नसेल तर सदरीं लिहिलेल्या दोन
बेरजा मिळतील कीं नाहीं?

## जबाब.

| | |
|---|---|
| १ अमानत इनाम जप्ती. | १ तगाईचे व्याजाबद्दल. |
| १ महसूलीभत्ता. | १ चावडीचे मदतीचा पैसा. |

येणेप्रमाणें खातीं निराळीं असून सदरहूच्या
वसूल पाठवितात तेव्हां रवानगी खर्चीत येऊन भ
रणा सरकार खात्यांत न ये तां ज्याचा त्या खात्यासच

पडतो, व त्या खेरीज साल अखेरीस गांवखर्चीची शिलक राहिल्यास रोख तालुक्यास पाठवितात तिचाही रवानगीखर्च त्यांस खर्च येऊन भरणा गांव निसबत खात्यांत पडतो- येणेप्रमाणें कारणांनीं सदरीं लिहिलेल्या दोन बेरजा मिळणार नाहींत.

स० सदरीं लिहिलेल्ले उत्तरांतील सर्व कारणे लणजे.

| | |
|---|---|
| १ परभारे भरणा. | १ खाटे रुपये लागले. |
| १ अमानत इनामजमी. | १ महसुली भत्ता. |
| १ तगाईचें व्याज. | १ चावडीचा पैसा. |
| १ गांवखर्चाची शिलक. | |

येणेप्रमाणें सर्व कारणांची सरसालांत कांहींच हरकत आली नसेल तर सरकार खात्यांतील वसुलाचे भरण्याचीच रवानगीची बेरीज मिळेल कीं नाहीं?

ज० जकाऊलांकडाबद्दल गांवीं दाखल्यास्तव जमाखर्च होतो सबब सरकार खात्यांत जमा व खर्च येत असल्यामुळें रवानगी वांचून भरणा पडतो-

व पाटील कुळकरणी ठाण्यास असतां वसूल पडेल तो ही* एकदम भरणा पडतो, अशा कारणानें सदरीं लिहिलेल्या दोन्ही बेरजा मिळणार नाहींत.

**स० वर लिहिलेल्या प्रश्नोत्तरांतील सर्व कारणें ह्मणजे.**

| | | |
|---|---|---|
| १ परभारे भरणा. | १ खोटे रुपये लागले. | १ अमानत इनामजप्ति |
| १ महसुली भत्ता. | १ तगाईचें व्याज. | १ चावडीचा पैसा. |
| १ गांवखर्चाची शिलक. | १ जळाऊ लांकडाबद्दल. | १ पाटील कुळकरणी ठाण्यास असतां वसूल पडतो तो. |

ए येणें प्रमाणें कारणांची सरसालांत अगदींच हरकत आली नसेल तर सरकार खात्यांतील इनामाखेरीज वसुलाचे भरण्याची आणि खानगीची बेरीज मिळेल कीं नाहीं?

**ज०** जी सूट पडते ती रकम वसूल आल्याप्रमाणेंच समजून खानगीखर्चात न येतां भरणा खर्च पडत्ये, सबब सदरीं लिहिलेल्या दोन्ही बेरजा मिळणार नाहींत.

(येणें प्रमाणें दाहा कारणांचा उल गडा प्रथम प्रश्नो-

---

* हीं दोन्हीं कारणें परभारे भरण्याचे सदरांतील च समजावीं.

त्तरांत नकरण्याचें कारण. दर एक कारणाबद्दल क सकसा प्रकार होतो याचा एकेठिकाणीं स्पष्ट खुला सा करतां येतनाहीं सबब इतके प्रश्न लिहिले आहेत.)

**स०** साल अखेरीस ठाण्यास पैसा पाठविला त्यांत खोटे रुपये लागले तरतेगांवीं पोतदारांचे नांवे ल्याहावे कीं नाहीं? तालुक्याहून रसीद अखेरतारीख झाल्यावर आली असून ठाण्यास अखेरतारखे च्या आंत पैसा जमा झाला आहे आणि याचा तालुक्यास व गांवीं कसे जमाखर्च केले पाहिजेत.?

**ज०** गांवचा व तालुक्याचा तपशील वार आढावा मिळाला पाहिजे म्हणून.

१ तालुक्यास सर्व वसूल आल्या प्रमाणें तपशील वार जमा करून खोटे रुपये लागलेले पोतदाराकडून भरून घेण्यास्त बतसल मातर खर्च ल्याहावे.

१ गांवीं खोटे रुपये लागले असून पोतदारांचे नांवें न लिहितां एकरकम भरणारखर्चे ल्याहावें म्हणजे बाक्यांस मेळ बरोबर राहील. पोतदाराकडून वसूल येईल तो परभारे ठाण्यास जमा करावा.

येणेप्रमाणें दोहींकडे जमाखर्च करावे.

**स०** रवानगींत खोटे रुपये लागले असून पोतदाराचे नांवे न लिहितां एकदम भरणाखर्चीत न्यावे लागतात असें कधीं काहीं कारणानें होईल कीं नाहीं? आणि पोतदारानें गांवीं अगर तालुक्यास रुपयेतर कोठेंही दिले नाहींत असें झालें आहे.

**ज०** सालअखेरीस रवानगी केली त्यांत खोटे रुपये लागले असतां पोतदाराकडून रुपये आले नसून बाक्यांचे मेळाखत गांवीं भरणाखर्च लिहिले पाहिजेत या कारणानें होऊं सकेल.

( सदरहूबद्दल खुलासेवार प्रश्नोत्तरें तालुक्याचे बुकांत लिहिलीं आहेत.)

**स०** सालअखेरीस रवानगींत खोटे रुपये लागले असतां गांवीं पोतदाराचे नांवें रकम देऊन, येणें काढण्यास काय हरकत? आणि आढाव्यास कसा फरक येतो.?

**ज०** सालअखेरीस गांवीं पोतदाराचे नांवें येणें काढिलें असतां तालुक्यांतील मौज्याचे खात्याकडे बा-

की ज्यास्ती निघून गांवीं कुळवारीकडे कमी निघेल. पोत दाराकडे बाकी कुळाप्रमाणेंच आहे यामुळें एकंदर बाकीस मेळ असेल परंतु मुलकी बाकी व नगाई यास मेळ असणार नाहीं. असा आदाव्यास फरक येतो तो नयेण्यास्तव वरील प्रश्नोत्तरांत लिहिल्याप्रमाणें जमा खर्च करून गांवीं साल अखेरीस पोतदाराचे नांवें येणें देऊं नये.

## अंक ६

## शिवायजमाखर्च.

**स०** वसूल आला असून खानगीत नयेतां एकदम भरणाखर्च पडतो याचें कारण काय? व सदरहूबदल जमाखर्च कसा करावा.?

**ज०** कुळानें परभारे भरणा केला असतां रकम वसुलांत येऊन खानगीत नयेतां एकदम भरणाखर्च पडतो. सदरहूबद्दल कुळाचे खातें जमा करून सरकारखातें भरणाखर्च ल्याहावे. असा जमाखर्च करावा.

**स०** फाजील देणें तें गांवाहून द्यावें किं बाकसें?

तें दिल्यानंतर जमाखर्च कसाकरावा?

ज० फाजीलदेण्यास पाटील यास अधिकार नसल्यामुळें मामलेदार यांणी दिल्यानंतर गांवी सरकार खातें जमाकरून कुळाचे नांवे ल्याहावें.

स० जी रकम खर्चाकडे लिहिली ती येण्याकरितां त्यास फाजिलाची रकम खर्चीकडे लिहिली, तिचा वसूल किती हप्त्यानें घेतात.?

ज० फाजिलाबद्दल रकम खर्चीकडे लिहिली तत्रापि ती येण्याची नव्हे, पूर्वीचें देणें होतें तें ज्याचें त्यास दिल्यानंतर येणें राहिलेंच नाहीं.

स० कुळास तगाई कोठून देतात? ती दिल्यावर जमाखर्च कसा करावा.?

ज० तगाई तालुक्याहून देतात, तिचा जमाखर्च सरकारखातें जमाकरून कुळवारनांवें ल्याहावें.

स० सालअखेरीस वसुलांत सालमोबादला झाला असें समजलें, तर तो दुरुस्त होण्यास्तव काय केलें पाहिजे.?

ज० जितके कुळांचे खात्यांत साल मोबदला

झाला असेल तितक्यांचे खात्यांत ज्या सालास जमा न व्हावयाचें असून झालें, त्या सालास खर्च लिहून बाजवी जमा होण्याचे सालास जमा करावे, याप्रमाणें जितकीं कुळें असतील तितक्यांचे खात्यास करून नंतर सरकार खात्यास भरणा पुरविलेला असतो तोही मुनाद त्याचाच असतो सबब ज्या सालास भरणा न पडावयाचा असून पडला, त्या सालास जमा करून बाजवी भरणा पडावयाचे सालास खर्च ल्याहावा. हा जमाखर्च सरकार खात्यांत करावा. येणें प्रमाणें दोन तऱ्हेचे जमाखर्च गांवी केले असतां सालमोबादला दुरुस्त होईल नंतर मामलेदार यांजकडे झाल्या हकीकतीचा रपोर्ट करावा.

स॰ कोणतेही वेळीं खाते मुबादला समजला तर किती कसे जमाखर्च करावे.

ज॰ ज्या खात्यास जमा व्हावयाचे नसून झालें त्यांस खर्च लिहून दुसरे खात्यास जमा करावे.

स॰ गांवचे वतनदाराकडे शेतसाऱ्याची बाकी येणें होती त्याबद्दल तालुक्यास त्याचे मुशाहिऱ्यांत वळून घेऊन जमाखर्च केला असतां गांवीं किती जमाखर्च करावे?

ज० ज्या वतनदारा कडे बाकी येणें होती त्याचे खा त्यास जमा करून सरकार भरणा खर्च, व गांव निसबत खातें जमा करून इसमवार खाते खर्च, येणें प्रमाणें जमाखर्च करावे; परंतु तालुक्याहून दाखला आल्या शिवाय करूं नये.

स० सदरी सांगितले दोन जमाखर्च, त्यांत प्रथम कोणता करावा?

ज० गांव निसबत खाते जमा करून इसमवार खातें खर्च, प्रथम करावा नंतर कुळाचे खातें जमा व सरकार खातें खर्च हा दुसऱ्यानें करावा.

स० गांव निसबत खर्चा बद्दल प्रथम जमाखर्च करण्याचें कारण काय?

ज० तालुक्यास वतनदाराचा पैसा सबब देवस्थान जमीदार वगैरे खातीं खर्च लिहून मौज्याचे जमा करितात त्यांत जमीदार खात्याचा खर्च पहिल्यानें असून मौज्याची जमा दुसऱ्यानें आहे यास्तव प्रथम खर्चा बद्दल जमा खर्च पहिल्यानें करून दुसरे जमे बद्दल दुसऱ्यानें करावा.

स० गांवीं मुख्यतें करून गैरवीरबेरीज, जमाखर्च किती प्रकारचे आहेत?

## जबाब.

१ परभारें भरणा.
१ तगाईचा.
१ रवानगीपरतजमा.
१ सालमुबादला झाला-तर.
१ सुटीचाजमाखर्च.
१ अखेरीस तोंड मिळ-वणीचा.
१ फाजीलपर न दिलेतर.
१ गांवनिसबतखर्चीबदल.
१ जमाबंदीचा किंवा मक्तेबाबीबदल.
१ खाते मुबादला झाला-तर.

ऐ येणेंप्रमाणें १० प्रकारचे जमाखर्च असून शिवाय अवल अखेर आदाव्याचे दोन, एकूण बारा प्रकारचे जमाखर्च आहेत.

---

## अंक ७

## जमाबंदीप्रकरणी.

स० अंबराई मक्ता झाल्यानंतर जमाखर्च

कसा करावा?

ज० सरकारखातें जमाकरून कुळाचे ह्मण-
जे मक्तेदार यांचे नांवें खर्च ल्याहावे.

स० कोणतेही मक्त्याबदल तालुक्यास त-
त्काल पैसा पावला असतां जमाखर्च कसा करावा?
उदाहरण, जळाऊ लांकडाबद्दल जमाखर्च कसा?

ज० सदरहूचा जमाखर्च दाखल्यास्तव सरका-
रखातें जमाकरून त्यांचे खातें खर्च ल्याहावे. ये वि-
षयीं रेविन्यूचें उत्तर नंबर १७ तारीख २५ डिसेंबर
१८५१ चें आहे.

स० पडित जमीनींतील किंवा कुरणांतील ग-
वताचें लिलांव झालें असतां अंबराईप्रमाणें ते वे-
ळेस जमाखर्च होतो कीं नाहीं?

ज० तत्काल जमाखर्च न होतां लावणीचे नं-
बराप्रमाणें सदरहूची व्यवस्था होते ह्मणजे याचा
जमाखर्च एकंदर जमाबंदी जमाखर्चांत होतो.
हे मक्ते सालाचे आरंभींच होतात.

स० जमाबंदी ठरल्यानंतर एकंदर जमाबं-

दीजमाखर्च कसा करितात, त्यास जमीन बाब, सायर बाब वगैरे तपशील कशावरून लाविनात! व पूर्वी मक्ते झाल्यासुद्धां बेरजा सदर हूजमाखर्चान्चे सदरी असतात कीं काय!

जं० एकंदर जमाबंदीजमाखर्च सरकार खातें जमा करून कुंवारव इसम वार खातेखर्चे ल्या हावे, त्यास जमीन बाब वगैरे तपशील लावणीपत्रकावरून किंवा चिठया वरून लावावा, व सदर हूजमाखर्चो-त एकंदर जमाबंदी समजण्यास्तव पूर्वीचे मक्त्यासु-द्धां बेरीजजमे कडे सरकार खात्याचे पोटीं दाखवून पू-र्वी केलेले जमाखर्च वजा जातां, बाकी बेरीज सदरी घालून तेवढेच रकमेचा जमाखर्च करितात.

स० पूर्वी झालेले मक्ते एकंदर जमाबंदीचे बेर-जेंत वजा जातां बाकी रकमेचाच जमाखर्च कां करि तात! पूर्वीचे मक्त्यासुद्धां न करण्याचें कारण काय!

जं० पूर्वी झालेले मक्ते जमाबंदीजमाखर्चोत ध-रिले असतां, एक रकमे बदल जमाखर्च दोनवेळ हो-तो सबब पोटीं एकंदर बेरीज दाखवून मक्ते झालेले

वजा करावे लागतात.

स० जमीनबाबेच्चे पोटीं जिरायत, बागाईत, व तरी, असे तपशील लावण्याचें कारण काय ?

ज० जिरायत, बागायत, तरीचा आकार समजण्यासाठीं किंवा कित्येक वतनदारास ह्या तीन बेरजें तून कोणते एका बेरजेवर हक पावत असतात; या करितां हे तपशील लाविले पाहिजेत.

स० जमीनबाब व सायरबाब यांचे पोटीं किती प्रकारानें सदरें असतात, व कितीप्रकारचीजमायें

जबाब.

| | |
|---|---|
| १ जमीनबाब......... | १ सायरबाबगांवींअसते |
| १ ऐनलावणी..... | १ नजराणा...... |
| १ ऐन काढी.... | १ रामोसपट्टी..... |
| १ जिराईत.... | १ पांढरगणा....... |
| १ बागाईत... | १ चर्मीजोडा...... |
| १ तरी.भात.. | १ घरपट्टी........ |
| १ | १ चर्सोचासुडी.... |
| | इत्यादि बाबी पूर्वी |

१ खरबुजवाडी उत्पन.
— १
१ लावणी खेरीज.
१ पडजमीनींतील ग-
वतलिलाव उत्पन्न.
१ आमराई मक्ता.
१ कुरण मक्ता.
१ दुसरे प्रकारचा-
मक्ता असला तर.
— ९
१ इनाम पैकी जोडी.
—९ येणे प्रमाणे बाबी येतात.

गांवीं येत असत परंतु सरकारानीं बाबी माफ करून लोकांचे नुकसानी चा ठराव करून त्यास राख पैसा देतात* यामुळे हल्लीं बाबी बंद आहेत फक्त नजराणा मात्र चालू आहे व क्वचित पांढरगणाही येतो तो दुमाले गांवीं मात्र.

स० कुळास सूट दिल्यानंतर जमाखर्च कसा करावा.?

ज० कुळाचे खाते जमा करून सरकार खाते खर्च ल्याहावे.

स० कीर्दींत जमेकडे, जमाबंदी जमाखर्चांत, जमाबंदीत पशीलवार असत्ये. त्यांतील ऐन सरकारची बेरीज व त्याचे जमाखर्चींतील कुळवार जमाबंदी नांवें

---

* हकदार लोकांचे रोखे परत घेऊन रुपये देऊन तीन वर्षांत निकाल करावा, इतःपर व्याजाचा पैसा मिळणार नाहीं म्हणोन सरकारचें पत्र ना. — इ. स. १८५६ चें

असत्ये त्याची बेरीज बरोबर मिळेल कीं नाहीं?

ज० पूर्वी झालेले मक्ते जमाबंदीजमाखर्चींतील कुळवारींत दाखल नसून ऐन सरकारींत असतात, सबब दोन्ही बेरजा मिळणार नाहींत.

स० जमाबंदीजमाखर्चींतील जमेकडील ऐन वसूली व सूट, व खर्चाकडील ऐन वसूली व सूट ह्या दोन बेरजा बरोबर मिळतील कीं नाहींत?

ज० पूर्वी मक्ते बाबीबदल जमाखर्च झाले असतात यामुळें सरकारचे ऐन वसुलांत रकम ज्यास्ती असून कुळवारींत कमी असल्ये सबब मिळणार नाहीं, सूट मात्र मिळेल.

स० एकंदर जमाबंदी जमाखर्चींत कुळवार नांवनिशी [illegible] कमा लिहिलेल्या असतात त्या प्रत्येक बेरजा लावणीपत्रकांतील कुळवार बेरजेस मिळतील कीं नाहींत?

ज० एक कुळानें मक्ता व लावणी केली असेल तर दोहींसुद्धां बेरीज लावणीपत्रकास असत्ये व एकंदर जमाबंदीजमाखर्चींत पूर्वी झालेले मक्ते वजा जातां बाकी बेरजेचा जमाखर्च होतो यामुळें कुळाचे नांवा

वर जमाबंदीजमाखर्चांत बेरीज कमी असून लावणी पत्रकांत ज्यास्ती असते सबब दोनबेरजा मिळणार नाहींत.

स० गांवची जमाबंदी कोणते मुकामीं कोणीं केली? हें कीर्दीन समजेल कीं नाहीं?

ज० सदर हूचा दाखला जमाबंदीजमाखर्च होतो तेव्हां लिहिलेला असतो तेथें समजेल.

---

## अंक ८

## इतरप्रश्नोत्तरें.

स० कीर्द हरवली तर कोणते कागदावरून होईल.

ज० ज्या सालची कीर्द त्या सालचे खतावणीवरून होईल, परंतु खतावणीस तपशील कीर्दीप्रमाणें साद्यंत नसल्यामुळें पूर्वीं कीर्द होती तशी नहोतां तांत्रिक मजकुरानें तयार होईल.

स० कीर्द ह्मणजे काय? व खतावणी ह्मणजे का-

य? व त्याचा उपयोग कसा?

ज० कीर्द म्हणजे तारीखवार जमाखर्च व शिलक समजणें यासाठीं, व खतावणी म्हणजे खातेवार बारमाही जमाखर्च असून येणें देणें समजतें यासाठीं.

स० कीर्दीत तारखेस पाटलाची सही कितीवेळ कोणकोणत्या ठिकाणीं होते.

ज० जमा व खर्चाकडील एकुणांत, व अखेर शिलकेवर, येणेंप्रमाणें तीन ठिकाणी होतें.

स० तारखेंत पाटलाशिवाय दुसरी कोणाची सही होईल कीं नाहीं?

ज० रवानगी केल्यास रुपये नेणाराची सही होईल.

स० सरसालांत जमेकडे व खर्चाकडे रकमा कितीवेळ आल्या असें कीर्दीत कोठें समजेल?

ज० अवल अखेर आढावा खेरीज करून बाकी रकमांस सेजनंबर लागला असतो तो अखेर

त्या नंबर पाहिला असतां समजेल.

**स०** चालत्या महिन्याच्या तिसरे हप्त्यास कांहीं कुळांस बाकी व कांहींस वसूल बरोबर व एकास फाजील झालें तें रवानगी करते वेळीं समजलें तर तें गांवीं परत मिळेल कीं नाहीं? नसल्यास तें मिळण्याविषयीं कुळ करण्यानें काय केलें पाहिजे?

**ज०** रवानगी करते वेळीं फाजील समजलें असतांहीं गांवीं परत मिळावयाचें नाहीं सबब आला हिदा मामलेदार यांजकडे रपोर्ट करावा ह्मणजे तालुक्यांतून ज्याचें त्यास फाजील परत मिळेल.

**स०** एका कुळाकडे रुपये १० येणें तो परागंदावगैरे झाले कारणानें त्याचे माल मिळकतीचें लिलाव करितां उत्पन्न रुपये १५ झालेतर हे सर्व त्याचे खात्यांत जमा करून फाजील देणें रुपये ५ काढावे कीं नाहीं?

**ज०** कुळाकडे जितकी बाकी येणें असेल तितकेच जमा करून बाकी पूज्य करावी, ज्यास्ती रुपयांची व्यवस्था तालुक्यास होईल.

**स०** गांवाहून साल अखेरीस रवानगी केली त्या-

ची रसीद त्या महिन्यांत नयेतां दुसरे सालांत आली, साल अखेर झालें सबब तिसावे तारखे अखेर रवानगीकडे आढावा काढावा कीं नाहीं ! तालुक्यास ज्यांतील त्या सालां त पैसा जमा झाला आहे.

**ज०** गांवीं साल अखेरची अखेर तारीख खुली अ सल्ये, तेथें रवानगी परत जमा करून भरणा खर्च ल्याहा वा, परंतु रवानगी किंवा तसलमाती कडे आढावा काढूं नये.

**स०** रवानगीकडे आढावा काढिल्यानें काय होईल !

**ज०** गांवीं वसुला बदल सरकार खात्यांत भर णा खर्च नसून त्या सालांत तालुक्यास मौज्याचे खात्या स जमा आहे असा रुजुवातीत फरक येईल सबब रवा नगीकडे आढावा काढूं नये.

**स०** गांवचे कीर्दीचा व सरसाल चे वसूल बाकी चा मेळ असतो कीं नाहीं ?

**ज०** वसूल बाकींत फक्त देण्या येण्याचीं खातीं मात्र दाखल होऊन कीर्दीत हरएक प्रकारचीं खा तीं येतात सबब मेळ मिळणार नाहीं.

**स०** एका कुळकरण्यानें तारखेची बेरीज

वसूल व शिलकेसुद्धां जमेकडे रुपये १० येतअसून बारा देऊन पदरचे दोन रुपये चुकून वसुलांत रवाना केले हीचूक समजल्यावर जमाखर्च कसे करावे.?

**ज०** ज्या तारखेस समजेल त्या तारखेस रुपये २ कुळकरण्याचे खाते घालून मागील चुकीच्या दाखल्यासह तपशील लावून जमा करावे आणि दोन रुपये तारखेचे बेरजेंत न धरितां समजून चुकीनें चूक उडवावी आणि हे रुपये त्याचे खात्यास मात्र दाखल करावे, सदरहू रुपये तालुक्याहून फाजिलाप्रमाणें देतील तेव्हां जमाखर्च करावा न दिल्यास गांवीं देणेचा आढावा काढावा, याप्रमाणें चुकीनें चूक उडवावी परंतु मागील तारखेस दुरेघ्या देऊन चीत वगैरे करूनये असा रेविन्यू कमिशनर यांचा ठराव आहे.

**स०** गांवीं वसूल ४० जमून रवानगी ३९ रुपयांची केली, पावती आल्यावर ३९ रुपये जमा करून भरणा खर्च ४० लिहिले, तारखेची एकुणांत बांधावयाची आहे तर कसें करावें.?

**ज०** दुरेघ्या देऊन दुरुस्त करून रुपया १ शिलकेंत

उतरावा.

**स०** गांवीं वसूल ४० जमून रवानगी ३९ रुपयांची केली, पावती आल्यावर जमा ३९ करून भरणारवर्च ४० लिहिले. असा प्रकार एकाच तारखेंत झाल्यामुळें जमा व खर्चीकडील रकमा समान होऊन शिलक पूज्य उतरली आणि कुळ करण्यानें रुपया १ खाल्ला त्याप्रमाणें सर्व महिना पुरा झाला तर ही चूक कोठे उपटावी व जमाखर्चीनें दुरुस्त कोणते रितीनें होईल?

**ज०** सदरहू चुकीमुळें तारीवार तेरीज वगैरे चूक उपटण्याचे कागद सालअखेर पर्यंत बराबर होतील, गांवीं ही चूक कधींही निघणार नाहीं. परंतु गांवचे व तालुक्याचे, महिन्याचे वसूल बाकीची रुजुवात होते वेळेस मात्र ह्या चुकीचा फरक येईल त्याकारणानें ध्यानांत येईल. जमाखर्चीनें दुरुस्त होण्यास्तव एक रुपया तालुक्यास रवानगीखर्च लिहून पाठवावा, पावती आल्यावर फक्त रवानगीखाते जमाच करावा ह्मणजे नारीखही मिळेल आणि सर्व दुरुस्त होईल; परंतु असा प्रकार कुळ करण्यानें मामलेदार यास जाहीर केला पाहि

जे. सदरीं लिहिलेला जमाखर्च मामलेदार यांचे हुकु मावांचून करूं नये.

**स॰** कीर्दीचे बार माही तेरजाखाली वसुलाचा तपशील दाखविला असतो ती बेरीज सरकार खात्या चे एकंदर खर्चाचे बेरजेस मिळेल कीं नाहीं?

**ज॰** सरकारखात्याचे नांवे कडे फाजिलाचा अवल आदा वा व अखेरीस अखेर आदावा असतो त्या दोन बेरजा एकंदर खात्याचे बेरजेंत वजा दिल्या असतां मिळेल.

**स॰** एक कुळकरण्याकडे दोन गांवची चहिवा ट असतां.

| | वसूल आलातो याजवीप्रमाणें- ज्याचात्या गांवास जमा करून. | रपोर्टीत आंकडे- उलट लिहिले से. |
|---|---|---|
| क | ५० | ७५ |
| ख | ७५ | ५० |

रपोर्टीत अंक लिहिल्याप्रमाणें गांववार खान गी खर्च लिहून ऐवज पाठविला. पावती आल्यावर क से जमाखर्च केले पाहिजेत? दोन्ही गांवचीं खातीं बरा

बर मिळवून दाखवावी.

## क. गांवचीकीर्द.

| जमा रुपये | | रुपये | |
|---|---|---|---|
| ० | शिलक. | (३) ७५ | खानगीखर्चे. |
| (१) ५० | कुळवार वसूल. | (८) ५० | भरणाखर्च |
| (५) ७५ | खानगी जमा.ख, गांवासखर्चे लिहिणे करितां. | | ख, गांवास खानगीजमा करून. |
| | | ० | शिलक. |
| १२५ एकूणएकशेंपंचवीसरुपये. | | १२५ एकुणएकशेंपंचवीसरुपये. | |

## ख. गांवचीकीर्द.

| जमा रुपये | | रुपये | |
|---|---|---|---|
| ० | शिलक. | (४) ५० | खानगी खर्चे. |
| (२) ७५ | कुळवार वसूल. | (६) ७५ | भरणा |
| (७) ५० | खानगी जमा.क, गांवास भरणाखर्चे लिहिणे करितां. | | खर्चे.क गांवास खानगी जमाकरून. |
| | | ० | शिलक |
| १२५ एकूणएकशेंपंचवीसरुपये. | | १२५ एकूणएकशेंपंचवीसरुपये. | |

दोहों कीर्दींतील रकमांचे डोक्यावर कंसांत नंबराचे अंक घातले आहेत त्या अनुक्रमानें जमा,खर्चे, पाहावे.

**क.** गांवचे
खतावणीपैकीं खानगीखातें.

| जमा रुपये. | रुपये. |
|---|---|
| ७५ परतजमा. ख, गांवास भरणा खर्चे लिहिणे करितां. ० लंग.--- | ७५ ख, गांवचा वसूल चुकून खर्चीपडला तो.--- ० लंग.--- |
| ७५ | ७५ |

**ख.** गांवचे
खतावणीपैकीं खानगीखातें.

| जमा रुपये. | रुपये. |
|---|---|
| ५० परतजमा. ख, गांवास भरणा खर्चे लिहून.-- ० लंग-- | ५० खानगीखर्चे. क, गांवा बदल.-- लंग.-- |
| ५० | ५० |

( कुळाची वगैरे आला हिशेब खातीं रितीप्रमाणें वबरोबर मिळावयाची सबबत्याची एथें दाखविणें जरूर नाहीं )

येणे प्रमाणें जमाखर्च केले ह्मणजे सर्व दुरुस्त होईल — नंतर रपोर्ट करावा ह्मणजे तालुक्यास ज्या मौज्याचा त्या मौज्यास वसूल दाखल होईल.

# खतावणीप्रकरणीं

## अंक १

गांवचे वहिवाटी विषयीं खातीं कशी आहेत या विषयीं.

स॰ गांवचे वहिवाटीस खातीं किती प्रकारचीं आहेत आणि त्यांत बाकी निघण्याची व तोंड मिळवणीचीं व दुबेरजीचीं कोणकोणतीं आहेत.?

## जबाब.

| | खातीं | शेरा. |
|---|---|---|
| १ | सरकार खातें. | देणें, घेणें व तोंडमिळवणी खर्चीकडे. |
| २ | कुळांचीं खातीं.<br>पोतदार यांचें खातें. | हीं खातीं बाकी निघण्याचीं परंतु पोतदाराचेनांवें बाकी सहसा काढूं नये. |
| ३ | खानगी खातें.<br>नाणें विकरी खातें.<br>महसूल भत्याबदल खातें.<br>तगाईचे व्याजाबदल खातें.<br>अमानत इनाम जप्तीखातें.<br>चावडीचे मदतीचा पैसा खातें. | नाणें विकरी खात्याची तत्काळ दुबेरजी होते, बाकी सर्व खात्यांची तालुक्यास पैसा पावून पावती आल्यावर जमा खर्च करितात, तेव्हां दुबेरजी होत्ये. |

गांव निसबत खर्चा-
बदल खातें.

अखेरीस खर्चा कडे-
तोंड मिळवणी येते.

गांव निसबत खर्च
व इनामदार यांचें
इसमवार खातें.

सदरहूची तोंडमिळवणी
रोखखर्चाबदल गांवनि
सबतखात्यांत व इनामा
बदल सरकार खात्यांत
येणेप्रमाणें दोनखात्या
त येते.

( त्याशिवाय कदाचित खाती आल्यास घालावी.)

येणेप्रमाणें गांवीं खातीं असतात.

**स०** अमुकखातें अमुकच पानावर आहे अ
सें कोठें समजेल ?

**ज०** खतावणीचे आरंभी पानपट्टी ह्मणजे अनु
क्रमणिका असत्ये त्यावरून समजेल.

**स०** अमुकनंबरचे अमुकखातें असें खात्यांत नं
बर पाहिल्यावांचून सर्वखातीं नंबरवार असा एकेठि
काणीं दाखला कोठें समजेल ?

**ज०** खतावणीचे पानपट्टींत समजेल.

# अंक १०

## सरकारखात्याप्रकरणीं.

स॰ सरकारखात्यांत जमाव खर्चीकडे कोणकोण प्रकारच्या रकमा येतात?

## जबाब.

## सरकारखातें

| जमा | रुपये | | रुपये |
|---|---|---|---|
| १ अवलआढावा तपशीलवार. | | १ फाजिलाबद्दल अवलआढावा. | |
| १ तालुक्याहून फाजीलपरत दिले असतां. | | १ वसुलाचा भरणा. | |
| | | १ ऐन. १ सालमुबादला | |
| १ कुळास तालुक्याहून तगाई दिली असतां. | | १ सूट. १ लंग. | |
| १ आमराई मक्ते वगैरे जमाखर्च. | | १ इनामाचा जमाखर्च साल अखेरीस. | |
| १ एकंदर जमाबंदी जमाखर्च. | | १ अखेरआढावा कुळवार- | |

| | | |
|---|---|---|
| १ | वसुलाचा आलमोबदला समजलेलाज मारवर्चीनें दुरुस्त केल्यास. | येणे बदल............ |
| १ | कुलवार फाजील देणें निघाल्यास......... | १ |
| | १ | |

येणे प्रमाणें रकमा सरकार खात्यांत येतील.

स० कोणतेही खात्यास येणें खर्चीकडे व वसूल आलेला जमेकडे असें असतें, परंतु एक खातें असें आहे कीं, वसूल खर्चीकडे व त्याबद्दल येणें जमेकडे असें खातें कोणचें. ?

ज० सरकार खातें आहे त्यांत वसुलाचा भरणा खर्चीकडे येऊन त्याभरण्याबद्दल येणें जमेकडे असतें- परंतु तो वसूल त्या खात्याचा समजूं नये — कुलवार वसूल समजावा. हा प्रश्न शब्दार्थाकरितां लिहिला आहे.

स० हरएक येण्याचे खात्यांतील खर्चीत जमा

वजा देऊन बाकी काढितात, तसे सरकार खात्यांतील वसुलाचे भरण्यांत जमा वजा देऊन बाकी काढितात किंवा जमेंत खर्च वजा देऊन बाकी निघते? याचा कारणवार खुलासा व्हावा.

ज० सरकार खात्यांत जमेकडे अवलआढावा व जमाबंदी असून त्याचा भरणा खर्चीकडे असतो सबब एवढ्यापुरतें हें देण्याचेंच खातें आहे असें समजलें पाहिजे- याकरितां जमेकडील देण्याच्या रकमांत खर्चीकडील भरणा वजा देऊन बाकी खर्चीकडे काढावी लागते व फाजिलामुळें सरकार खातें हें येण्याचें समजलें पाहिजे.

स० सालमजकुरीं कुळांनीं परभारे वसूल किती वेळ किती रुपये भरले असें समजेल कीं नाहीं? समजल्यास एके ठिकाणीं कोठें समजेल.?

ज० सरकार खात्यांत समजेल.

स० साल अखेरीस सरकारी देणेंयेणें किती राहिलें हें कोठें समजेल.?

ज० सरकार खात्यांत, कीर्दीतील अखेर आढाव्यास, व सरसालचे वसूल बाकींत, येणेंप्रमाणें तीन जागीं समजेल.

स॰ सरकारखात्याचे एकंदरबेरजेप्रमाणें खताव णीचे तेरजांत सरकारखात्यास बेरीज दाखल अस ते कीं नाहीं व या दोन रकमा बरोबर मिळतात किंवा कसें?

ज॰ सरकारखात्याचे एकंदर बेरजेंत अखेर आढावा असून तेरजांत नसतो सबब मिळणार नाहीं.

तात्पर्य- देण्याघेण्याचे खात्यास ज्या बाजूस अवल आढावा असेल ती बाजू बरोबर मिळून अखेर आढा-व्या कडील बेरीज खात्यांत असून तेरजांत नसते सबब मिळणार नाहीं.

(अखेर आढावा खतावणीचे तेरजांत कां आणी त नाहींत या विषयीं अखेर आढाव्यांत लिहिलें आहे.)

---

## अंक ११

## कुळाचे खात्याप्रकरणीं.

ख॰ कुळाचे खात्यांत जमा व खर्चीकडे कोण कोणत्या प्रकारच्या रकमा येतील?

ज॰ कुळाचे खाते येण्याचे.

प्रकार १

| जमा | रुपये· | | रुपये· |
|---|---|---|---|
| १ वसूल· ऐन सूद· | | १ अवल आढावा······ | |
| १ सालमोबादलाजमा· | | १ तगाई दिली असतां· | |
| १ अखेर आढावा· | | १ जमाबंदी··············· | |
| | | १ सालमोबादलाखर्च··· | |
| १ | | | |
| | | ५ | |

कुळाचेखातेदेण्याचेप्रकार·२

| जमा· | रुपये· | | रुपये· |
|---|---|---|---|
| १ फाजिलाबदल अवल-आढावा············· | | १ फाजील परत दिलेतर खर्च, न दिलेतर अखेर आढावा· ············· | |
| २ | | | |
| | | २ | |

त्या दोन प्रकारानें कुळांचीं खातीं असून सदरीं लिहिल्याप्रमाणें जमा व खर्चीकडे रकमा येतील·

स॰ एका इसमाकडे इनामचालावयाचें अमुक, पैकीं सरकारांत यावयाची जोडी अमुक असें कोठें समजेल?

ज॰ जो इसम असेल त्याचे खात्यांत समजेल·

स० मतबंदी होऊन नंबरास अकार बसला असा नंबर कोणाएकाकडे वहिवाटीस असून भर आकार न घेतां कांहीं कमी घेतात असा नंबर कोणचा?

ज० इनामपैकीं जोडी त्याप्रमाणे हिस्सा दरसाल सरकारांत कापून घेण्याविषयीं ठराव असतो तो.

स० कुळाचें नांव खतावणींत किती ठिकाणीं समजतें?

ज० अनुक्रमणिकाखातें व पुरवणीखातें पडल्यास आणि बारमाही नेरीज येणेप्रमाणें चार ठिकाणीं समजेल.

स० कुळाचे खात्यांतील बारमाही वसुलाच्या बेरजा एकत्र केल्या असतां ती बेरीज सरकार खात्यांतील वसुलाबदल भरण्याचे बेरजेस मिळेल कीं नाहीं?

ज० जकाऊ त्यांकडांचा मक्ता होऊन तत्काळ पैसा तालुक्यास पावतो सबब गांवीं दाखल त्यास्तव सरकारखात्यांत जमाखर्च होतो ती बेरीज भरण्यांत येते. कुळवार वसूलजुळला असतां भरण्याचे बेरजेस मिळणार नाहीं सरकारखातें हें कुळाचे खात्याप्रमाणें समजून वसूल जुळतेवेळेस कुळवारीं न दाखल केलें तर भरण्यास मिळेल.

स० सालवारबाकीची सूट कोणते कुळास किती व एकंदर किती पडली, हें कोठे कोठे समजेल?

ज० जितके कुळांस पडली असेल तितक्यांचे खात्यांत व एकंदर सरकार खातें. कुळवार एकंदर एके ठिकाणी नमुना नंबर ५ व नमुना नंबर २२ यांत समजेल.

स० सालमजकूरची सूट कोणास किती व एकंदर किती पडली असें कोठे कोठे समजेल?

ज० जितके कुळांस पडली असेल तितक्यांचे खात्यांत, व एकंदर सरकार खात्यांत, व जमाबंदीजमा खर्चांत- लावणीपत्रक, व सालमजकूर हें त्याचीवसूल बाकी व सरसालची वसूल बाकी, यांत कुळवार एकंदर समजून नमुना नंबर १५ यांत एकंदर समजेल. येणेप्रमाणें सात ठिकाणी समजेल.

स० सालवार व सालमजकूर सुद्धां सूट कोणास किती व एकंदर किती पडली असें कोठे कोठे समजेल?

ज० जितके कुळांस पडली तितक्यांचे खात्यांत व एकंदर सरकार खात्यांत व नमुना नंबर २२ चे वसूल

बाकींत कुळवार व एकंदर समजेल.

स० कीर्दीचे आगोदर खतावणी होते कीं नाहीं?

ज० सालमजकूरचा वसूल घेणें किती हें समजण्यास्तव कुळाचे खात्यांत सदरचा आंकडा न लिहितां नंबर ९ करवार तपशिलानें लिहितात ती, व सालचे अखेरीस तोंड मिळवणीची- येणेंप्रमाणें दोनवेळ कीर्दीचे आगोदर खतावणी गांवींच होते.

स० सदरी सांगितले कीर्दीचे आगोदर सदरचा आंकडा न भरतां खतावणी करितात त्यास कोणकोणते कागद पाहिजेत व अशी आगोदर खतावणी करण्याचें कारण काय?

ज० गुदस्तखतावणी व साल मजकूर नमुना नंबर ७ चें कमज्याजती टिपण येणेंप्रमाणें कागद लागतात, परंतु याचा मुकाबिला पाहणी खडर्याचें बोट खत धरून करावा ह्मणजे निःसंशय होईल- जमाबंदी येणें करण्यापूर्वी साल मजकूरचा वसूल घ्यावयाला गतोत्याचा अजमास कळण्यासाठीं आगोदर सालमजकूर जमाबंदी लिहितात.

स० कुळाचे खात्यांत सालमजकूर जमाबंदी बार केली असल्ये तिजला जिराईत, बागाईत, तरी, हे तप शील कशावरून लावीत असतात ?

ज० पाहाणी खरड्यावरून कुळवार निवड करून लावावे लागतात.

स० एक नंबर चार कुळांकडे असेल तर खातीं किती घालावीं ?

ज० नंबराची हिःसेफोड झाली असेल तर खातीं चार घालावीं. नसल्यास एकच घालावें.

स० एक कुळाकडे सबंध नंबर २ व दुसरे नंबर पैकीं $\frac{1}{2}$ हिःसा असेल तर खात्यांत नंबराची बेरीज २॥ द्यावी किंवा कसें ?

ज० एक कुळाचे खात्यांत हिःसा $\frac{1}{2}$ असला तथापि १ नंबर समजून नंबराचे ओळींत एकाचा अंक घालून बेरीज सबंध नंबराप्रमाणेंच द्यावी, आणि तिघांचे खात्यांत नंबराचे ओळींत शून्य घालून अमुक नंबरापैकीं हिःसा, इतकेंच दाखवावें, बेरजेंत आणूं नये.

स० तिघां कुळांचे खात्यांत नंबर पैकीं हिःसा असून

त्याबदल शून्य घालून बेरजेंत आणीत नाहीत याचें कारण काय!

ज० एक नंबर चार कुळांकडे असल्यामुळें चौघांचे खात्यांत ¼ नंबर एक प्रमाणें समजून बेरीज दिली, तर एकाचे चार नंबर होतील. यामुळें खतावणींतील लावणी नंबराचा व लावणीपत्रकांतील लावणी नंबरांचा मेळ राहणार नाहीं, तो राहणें जरूर, सबब एकाचे खात्यांत हिःस्सा ऐवजीं एक नंबर लिहून तिघांचे खात्यांत शून्य घालावें लागतें.

स० कुळाचे खात्यांत वरील रकमेस कीर्दपान ज्यास्ती असून खालचे रकमेस कमी असतें याचें कारण काय!

ज० कुळाचे खात्यांत सदरचा आंकडा नभरतां जमाबंदी लिहिली असल्यें ती लिहिल्यानंतर किती एक रकमा कुळाचे नांवे खर्च पडतात आणि जमाबंदीत रेल तेव्हां कीर्द पान लागतें तें ज्याजती अथवा कीर्दीचे शेवटचे असोन जमाबंदी बार केली असतें तिचे पुढील रकमांस कमी असतें. या कारणानें होईल.

स० कुळाचे खात्यांत एक नंबरचा आकार २५,

रुपये दाखल असून त्याजकडे येणें १० रुपये का दितात याचें कारण काय? नंबर वनचराईचा नव्हे.

ज० जोडी इनाम असेल तर असें होईल.

स० कुळाकडे ज्या नंबराबदल जमाबंदी येणें ठरविली त्याहून ज्यास्ती आकार मागाहून घेत लाजातो याचें कारण काय?

ज० कुळानें वनचराईचा नंबर घेतला तेव्हां लिलाव आकार त्याजकडे येणें ठरविला, कांहीं दिवसांनीं तो नंबर त्याणें लागण केला तर भर आकार येणें ठरविला पाहिजे अशा कारणानें ज्यास्ती आकार घेतला जाईल.

स० कुळाकडे जितके प्रत बंदी नंबर आहेत तितक्या सर्व नंबरचा आकार कुळाकडे येणें निघत नाहीं याचें कारण काय असावें?

ज० हिरावाचा नंबर कौली. इस्तावा. इत्यादि कारणें असलीं तर असें होईल.

स० एका कुळाकडे जमीनबाब, सायरबाब ह्या दोन्ही प्रकारची जमाबंदी येणें असून वसूल आलेला

दोहीं बाबेत वजा करून बाकी दोन्ही बाबींची काढावी कीं काय?

ज० साल अखेरीस दोहीं बाबींचीबाकी न निघे अशी तजवीज ठेवावी. कुळाकडून तशा बेताचा वसूल न आला तरच दोहीं बाबेची बाकी काढावी असा रिविन्यू कमिशानर यांचा ठराव आहे.

स० कुळाचे खात्याचे व खतावणीचे नेरजांतील त्याचे खात्याचे बेरजेस मेळ असतो कीं नाहीं.?

ज० खात्यांत अखेर आढावा असून नेरजांत नसतो सबब मेळ असणार नाहीं.

स० कोणी मनुष्याचे नांवें देणें नसून खर्च लिहिले. येण्याकरितां लिहिलें नाहीं असें असून खर्च लिहितात अशा रकमा कोणत्या.?

ज० देण्याचा अखेर आढावा निघतो तो. त्यासाठी येण्यास्त घ लिहीत नाहीत. फक्त तोड मिळवणीस्तव च खर्चाकडे लिहितात.

स० एका कुळाच्या खात्यांत अवल आढावा २५ रुपये जमाबंदी २५ रुपये. एकूण ५० रुपये यांत वसूल ४० वजा जातां

बाकी १० निघावी ती १२ निघते याचें कारण काय ?

ज० कोणतेही एकाखात्यांत देणें कांहीं, व येणें कांहीं असें निघाल्यास सदरीं लिहिल्याप्रमाणें होईल.

प्रश्न (मोघम.)

खतावणीचे तेरजाप्रमाणें खात्याच्या एकंदर बेरजा असतात कीं नाहींत. ?

जबाब.

देण्या येण्याचे खात्यांत अखेर आढावा असून खतावणीचे तेरजांत नसतो सबब दोहींकडील बेरजा सारख्या असत नाहींत.

स० कुळांचे खात्यास कमज्यास्तीचा तपशील कोणत्ये कागदावरून करावा ?

ज० सालगुदस्त खतावणी, व सालमजकूर नमुना नंबर ७ चे कमज्यास्ती टिपण किंवा नमुना नंबर १४ यावरून करावा.

स० सरसालांत खोटे रुपये अमुक लागले असें कोठें समजेल कीं नाहीं ?

ज० पोतदाराचे खात्यास समजेल.

# अंक १२

## रवानगीरवात्याविषयीं.

स॰ सरसालांत कितीवेळ, कितीरुपये तालुक्यास पाठविले हें समजेल कीं नाहीं,? समजल्यास कोठें समजेल.?

ज॰ सर्व रवानगी रवात्यांत समजेल.

स॰ सरसालांत गांवाहून ठाण्यास किती पैसा गेला हें कोठें समजेल.?

ज॰ रवानगीरवात्यास समजेल.

स॰ रवानगीरवात्याचे बारमाहीबेरजे इतका सर्वपैसा ठाण्यास पावताझाला असा संशय येण्यास काय आधार आहे.?

ज॰ रवोटे रुपये लागले असल्यास संशय येईल परंतु ते रवोटे रुपये पावले असेंच समजलें पाहिजे.

स॰ सरसालांत रवोटे रुपये अमुकलागले असें रवानगीरवात्यांत समजेल कीं नाहीं.?

ज॰ तेथें एकवेरीज असल्ये, तपशील नसतो सबब समजेल नाहीं.

# अंक १३

## गांवनिसबत खर्च व इनामदार-यांचें इसमवार खातें याविषयीं.

स० गांवखर्चाचा पैसा गण्यांतून पावला अ-सतां अखेरपर्यंत जमाखर्च कसे करावे.?

ज० गांवनिसबत खातें जमा करून इसमवार खातें खर्च ल्याहावे व अखेरीस इसमवार खातें जमा करून गांवनिसबत खाते खर्च ल्याहावे.

स० वरलिहिल्याप्रमाणें एका खात्यांत जमा व दुसऱ्यांत खर्च यास्तव दोन खात्यांच्या बेरजा बरोबर मिळतील की नाहींत?

ज० इसमवार खात्यांत गांवनिसबत खर्चाचे बेरजे पेक्षां इनामाचा खर्च ज्यास्ती असतो सबब दोन खात्यांच्या बेरजा बरोबर मिळणार नाहींत.

स० गांवनिसबत खर्च खातें व इसमवार खातें येणेप्रमाणें दोन खातीं ठेवण्याचें कारण काय.?

ज० सर्व सालांत गांवखर्चाचा पैसा जमा झाल्या

प्रमाणें खर्च पडला तर, एकाच खात्यांत जमा व खर्च ठेविला असतां हरकत पडणार नाहीं; परंतु तसें होत नाहीं, कारण परत्वें शिलक राहत्ये. यास्तव एक खात्यांत शिलक असल्यामुळें ती खर्चीकडे नेऊन खातें मिळेल, तत्रापि देणें येणें समजणार नाहीं व सरकारखात्याशिवाय दुसरे कोणतेही खात्यांत देणें येणें असूं नये असा सरकारचा ठराव आहे यास्तव दोन खातीं ठेविलीं पाहिजेत. (परंतु साल अखेरीस शिलक राहिली असतां देणें येणें न काढितां तालुक्यानी शिलक रोख पाठवून द्यावी, म्हणजे काहींच अडचण नाहीं.)

**स०** साल अखेरीस गांवखर्चापैकीं चिल्हरची शिलक राहिल्यास आदावा काढितात कीं नाहीं?

**ज०** आदावा न काढितां तालुक्यांतील वसूल बाकीस मेळ पडावा म्हणून रोखच गांव निसबत खातें खर्च लिहून शिलक तालुक्यास पाठवितात.

**स०** साल अखेरीस गांवखर्चाची शिलक राहिल्याम तालुक्यास रोख पाठविल्यानें वसूल बाकीस कसा

मेळ राहतो?

**ज०** तालुक्यास पक्के सदरीं खर्च पडल्याप्रमाणें गांवीं पैसा पावला नाहीं ह्मणून शिलक राहिली येणें करून खर्च पडल्याप्रमाणें आदा झाला नाहीं हें बरोबर नाहीं सबब तालुक्यास ज्या खात्यास खर्च पडला त्या खात्यास जमा झाली ह्मणजे मेळ बराबर पडतो सबब गांव खर्चाची शिलक रोख पाठवावी लागत्ये.

**स०** गांवीं इनामाचा जमाखर्च किती वेळ कसा होतो?

**ज०** इनाम जमाखर्च, जमाबंदी जमाखर्चाचे वेळेस व साल अखेरीस तोंड मिळवणीचा येणेंप्रमाणें दोन वेळ होतो.

**स०** परभारे जमाखर्चाची बेरीज किती कागदीं, कोठें समजेल?

**ज०** कीर्दीतील जमाबंदी जमाखर्चांत, खतावणींतील सरकारखात्यांत, व इसमवार खात्यांत, व लावणीपत्रकास भेळास्तव धरिलें असल्यास तेथें, व जमाबंदी ठराव बंदास, येणेंप्रमाणें ५ कागदीं समजेल.

**स०** गांवच्े वपरगण्याचे वतनदाराबदल आकारणी व वसूलबाकी कोठें समजेल?

**ज०** सालअखेरीस तोडमिळवणीचा जमाखर्च इसमवारखात्यांत होतो तेथें सदरहूचा सर्व दाखला असतो व परगण्याचे वतनदार व वर्षासनाबद्दल आकारणी मात्र समजते परंतु वसूलबाकी समजत नाहीं.

**स०** वतनदार वगैरे इसमास आकारणीचा तपशील गावीं कोठून लावावा?

**ज०** आकारणीचे टिपणावरून लावावा.

**स०** कोणी एकाचे नांवें येणें नसून जमा करितात, येणें मोडण्यास्तव करीत नाहीत, व देणें काढण्यास्तवही करीत नाहीत असें असून जमा करितात असें कोणतें.

**ज०** इसमवारखात्यांत सालअखेरीस इनाम जमा करितात तें. तात्पर्य तोंडमिळवणीची जमा.

**स०** कोळी रखवालदार यांणी डोंगरीजमीन केली असतां कसें करावें?

ज० प्रथम दखेहरानाप्रमाणें व सूल घेऊन रपोर्ट करावा, निर्णय झाल्यानंतर जसा हुकूम येईल त्या प्रमाणें करावें, ह्मणजे इनामांत दाखल करण्याविषयीं असल्यास त्याप्रमाणें, न सल्यास केल्याप्रमाणें काईम ठेवावें.

स० नंबर पडित असून भर आकाराप्रमाणें जमाबंदींत दाखल होतो असा कोणता?

ज० इनामीनंबर.

स० इसमवार खात्यांतील परभारें इनामाची बेरीज दरसाल काईम असत्ये कीं नाहीं? इनाम खालसांत आलें नाहीं व मुबादला ज्यास्ती दिलें नाहीं.

ज० पांढरगणा व घुगरी गल्लावगैरे परभारें हक वतनदारांस पावतात ते दरसाल कम ज्यास्ती होतात सबब दरसाल परभारेची बेरीज काईम असणार नाहीं.

स० सरकारचा तोटा नहोतां बेरीज इनामांत दाखल होते असें कशानें होतें.?

ज० पांढरगणा वगैरे परभारे हक याबदल रकं

म इनामांत दाखल होत्ये तो सरकारी तोटा नव्हे.

स० गांवीं कोणते इसमाबदल इसम वार खा त्यांत वसूल बाकीचा दाखला ठेवितां येतो.?

ज० गांवचे वतनदाराबदल मात्र ठेवतां येतो.

स० परगण्याचे वतनदाराबदल कां ठेवितां येत नाहीं?

ज० त्यास एकंदर परगण्यावर हक पावतो त्यांत अमुक गांवाबदल अमुक हें समजत नाहीं सबब.

स० एक मनुष्याचा इनामाचा आकार २७ रुपये आहे आणि दोनसाल इनामखर्च पडते व तिसरे सालीं नसून पुढें दोन सालें खर्च पडते याचें कारण काय?

ज० तीनसाल इनामपट्टी, ह्मणजे दोन सालें २७ रुपये त्यास इनाम मिळून दरसाल रुपये ९ जोडी दाखल, तिसरे सालीं तीन सालाबदल आकार का पावयाचा, असा प्रकार एकादे इनामदारास असला तर असें होईल.

स० दरसाल इनामाची बेरीज कम ज्यास्ती हो ते, यास कारणें किती आहेत.

जबाब.

१ इनाम खालसांत आलें तर. २ कोणास नवीन इनाम दिलें तर.

३ पांढरगणा, घुगरीगल्ला-वगैरे पर भारे हक कम-ज्यास्ती होतात नेजाल्यास.

४ तीनसाल इनामपट्टी असली तर तिसरे सालीं कमी व दोन साल ज्यास्ती.

येणेप्रमाणें चार कारणें आहेत. ..................

# अंक १४
## इनामजमीविषयी.

**स०** इनामदार मयत अथवा परागंदा झाला, तर त्याचे इनामाची काय व्यवस्था होते.

**ज०** इनामाची जप्ती होते.

**स०** इनामजप्तीचा वसूल आला तर, घ्यावा कीं नाहीं? घेतल्यास कोणचे खात्यांत जमा करावा?

**ज०** सदरहूचा वसूल घेऊन इनामजप्तीखातें जमा करावा.

**स०** कोणतें इनामजप्तीचे वसुलाचा भरणा सर

काररवात्यांत खर्च पडतो ! व कोणते इनामजप्तीच्यात्या

च ह्मणजे इनामजप्ती खात्यांत पडतो ?

ज० किरकोळ इनाम जप्त झालें असतां सरकार

खात्यांत वसूलखर्च पडतो व मोठे इनामाची अमानत

झाली असतां अमानत जप्ती खातें पडतो.

स० इनामजप्ती मोठी व किरकोळ ही सारखी अ

सून दोन प्रकारचे वहिवाटीचें कारण काय?

ज० किरकोळ इनामें हरवक्त जप्त होतात,

त्यांची घालमेल नपडण्यास्तव वसूल येईल तो

पके सदरीच जमा करितात. परत देणें झाल्यास ता

लुक्यास मौज्याचे खातीं खर्च पडून पैसा पावला

ह्मणजे गांवीं फाजिलप्रमाणें जमाखर्च करावा व मोठे

इनामाची अमानत सरकारास दाखविणेंजरूर

स बब तालुक्यासही अमानतींत जमा करितात, या

कारणास्तव दोन वहिवाटी आहेत.

स० किरकोळ इनामजप्तीचे वसुलाचा ऐवज

सरकारखातें भरणाखर्च पडून तालुक्यास पके

सदरीजमा झाला, त्याच सालांत इनाम खुलें होऊन

ज्याच्या त्यास पैसा रोख परत दिला, तर तालुक्यास कोणते खाते खर्च लिहून देतील? व सदरहूचा गांवीं जमाखर्च कसा करावा.?

**ज०** तालुक्यास मौज्याचे खातीं खर्च लिहून देती ल. गांवीं सरकार खातें जमाकरून इनामजप्ती खातें खर्च, व अखेरीस इनामजप्ती खातें जमाकरून सरकार खातें खर्च, येणेप्रमाणें जमाखर्च करावे.

**स०** कोणते जप्ती जमीन बाबेचे नांवें जमाबंदी पडते किरकोळ किंवा अमानत (ह्मणजे मोठे.)

**ज०** किरकोळजप्तीजमीनीचे वाहणारे कुळाचे नांवें इनामजप्तीखात्यांत जमाबंदी खर्च पडतो.

**स०** इनामाची जप्ती झाली असतां इनामांत आकार खर्च पडतो कीं नाहीं? पडत असल्यास कारण काय?

**ज०** जप्ती झाली तत्रापि इनाम खालसांत आलेले नव्हे सबब इनामांत रकम काईम राहते.

**स०** एक नंबराबदल आकार जमाबंदींत दुबार दाखल होतो असा कोणचा? व कारण काय?

ज० किरकोळ इनामीनंबर जप्त झाला असतां आकार दुबार दाखल होईल- ह्मणजे एक ऐन वसुलांत व दुसरा इनामांत.

स० इनामजप्तीपैकीं पैसा रोख आलातर, जमाबंदी जमाखर्चाचे वेळीं इनामाची बेरीज कमी करावी कीं काय? नसल्यास जमाबंदीजमाखर्चांत इनामजप्तीची जमा कशी दाखवावी-?

ज० रोख वसूल आला असला तत्रापि इनामाची रकम कमी न करितां कुळाचे खात्याप्रमाणें जप्ती जमीनबाब, असें खातें घालून जमाबंदी नांवें ल्याहावी, आणि सरकारखात्यांत लावणीखेरीज उत्पन्नाचे सदराबरोबर इनामजप्तीजमीनबाब असें सदर करून जमाबंदी दाखल करावी.

## अंक १५
## पावतीप्रकरणीं.

स० कुळाचे पावतीची रुजुवात कशी करावी

ज० कुळाचें खातें व पावती घेऊन कुळाचे तों ज्ञानें वसूल दिलेला बोलवून खात्यास व पावतीस मुकाबिला पाहावा, व इतर जमेस (महसुली भत्ता, तगाईचें व्याज, वगैरे) जितकीं खातीं असतील तितकीं सर्व काढून पाहावीं.

स० सालवारीचें फाजील तालुक्याहून कुळास दिलें असतां गांवचे पावतीवर मांडितात कीं नाहीं?

ज० कोठें कोठें मौज्याचे खात्याचा आणि पावतीचा मेळ असावा, असा अभिप्राय जाणून मांडीत नाहींत व कोणी मौज्याचे खात्याचा आणि पावतीचा मेळ राहणें जरूर नाहीं जाणून मांडून देतात. येणेंप्रमाणें दोन वहिवाटी आहेत.

स० सालमजकूरचें फाजील दिलें असतां गांवचे पावतीवर कोणीकडे मांडून देतात?

ज० पावतीवर खर्ची कडे मांडितात.

स० कुळाचे खात्यास आणि पावतीस मेळ असतो कीं नाहीं?

ज० जमाबंदी वगैरे येणें खात्याप्रमाणेंच पावती

वर असून महसुली भत्ता व तगाईचें व्याज पावतीवर खात्यापेक्षां ज्यास्ती मांडिलें असतें या कारणानें खात्यास आणि पावतीस मेळ नसतो.

स० पावतीची तोंड मिळवणी कशी करावी? आणि वहिवाट कशी आहे.?

ज० महसुली भत्ता व तगाईचे व्याजाबदल वगैरेजमा ज्यास्ती असल्येसबब.

१ कित्येक ठिकाणीं जमेची ज्यास्ती बेरीज तोंड मिळवणी स्तव खर्च, असें खर्चाकडे लिहून तोंड मिळवणी करितात.

१ काही ठिकाणीं जमेची एकंदर बेरीज देऊन पैकीं वजा ज्यास्ती इतर खात्याबदल जमा वजा देऊन बाकी काढून तोंड मिळवितात.

येणें प्रमाणें वहिवाटी आहेत.

स० खात्याप्रमाणें पावतीस कमज्यास्ती कोणते कागदावरून करावें.

ज० पावतीस कमज्यास्ती होत नाहीं.

स० गांवचे पावतीस व गांवचे सरकारखात्यास मेळ

असतो कीं नाही.

ज० सरकार खात्यांत इतर खात्याचे बेरजांचा भरणा नसून त्या भरण्याबद्दल रकमा पावतीवर असतात सदरहू मेळ असणार नाहीं. जेथें मौज्याचे खात्या [illegible] त्याशी वहिवाट आहे तेथें अवल आदाव्याचे फाजिला वांचून सर्वमेळ बरोबर असतो.

स० मजकडील वसूल अमुक तारखेस सालवार वगैरे तपशील वार कीर्दीचे कोणते पानावर जमा आहे, असें समजण्यास कुळापाशीं काय दाखला आहे?

ज० पावती आहे.

---

## अंक १९

### नमुना नंबर ५।६।१२ मिळून ३ वसूल बाक्या संबंधीं

स० नमुना नंबर ५ चा कागद कशावरून करावा?

ज० खतावणीवरून- तात्पर्य, कोणतीही वसूल बाकी करणें ती खतावणीवरून करावी.

स० सदर सालांत सालवार बाकीचा कुळवार

माहेवार एकंदर वसूल किती आला असें एक ठिका णीं कोठें समजेल ?

ज० नमुना नंबर ५ सालवार बाकीचें वसूल बाकी पत्रक यांत समजेल.

स० नमुना नंबर ५ यांतील वसुलाचा मेळ कोण कोणते ठिकाणीं असतो ?

ज० सरकारखात्याचे खर्चीकडील भरण्याचे तपशिलांत, व नमुना नंबर १२ यांतील पोटलेजर, सर सालची वसूल बाकी, यांत; येणेप्रमाणें तीन ठिकाणीं असतो.

स० नमुना नंबर ५ अथवा सालवार बाकीची वसूल बाकी; यांत सर्व सालोसालच्या हरएक प्रकारच्या बाक्या व वसूल दाखल होतात कीं नाहींत ? व सदरहू वसूल बाकींत सालवार तगाईचा वसूल दाखल होतो कीं नाहीं ?

ज० नमुना नंबर ५ ची वसूल बाकी फक्त जमाबंदीसबंधीं जी सालवार बाकी राहील तिचे वसुला पुरती आहे त्यांत तगाई वगैरे इतर वसूल

आले, तत्रापि सदरहू वसूलबाकींत दाखल होत नाहींत.

स० नमुनानंबर ६ चा कागद कशावरून करितात? व या कागदांतील वसुलाबेक कोणकोणते ठिकाणीं असतो.?

ज० नंबर ६ चे वसूलबाकीचा सर्व प्रकार नंबर ५ चे वसूलबाकीप्रमाणेंच असून नंबर ६ चे वसूलबाकींत सालवार व सालमजकूर मिळून तगाईचीच वसूल बाकी होते, इतकाच फरक आहे.

स० चालते सालचे हप्त्याची वसूलबाकी व सालवार बाकीची वसूल बाकी यांतील एका वसूल बाकीस फाजील झालेलें ह्मणून कोष्टक आहे त्यांत फाजील दाखल असून सदरहू बदल आढाव्यांत कुळाचें देणें निघत नाहीं याचें कारण काय असावें.?

ज० सालमजकूर हप्त्याचे वसूल बाकीस फाजील झालें असतां सालवार बाकी येणें असल्यास सालमजकुरास खर्च लिहून सालवारींत जमा करितात. असा जमाखर्च कुळाचे खात्यांत केला असतां सालवारी

चें येणें कमी होईल. याप्रमाणें प्रकार झाला असल्यास सालमजकूरचे फाजिलाबदल देणें न निघतां ती बाकी सालवारींत मुरेल. एकंदरीचे येण्यापेक्षांच जर वसूल जास्ती आला तरच देणें निघेल.

स० सालवार व सालमजकूर मुलखी बाकी नगाई सुद्धां माहेवार, व बारमाही वसुलाच्या बेरजा एके ठिकाणीं कोठें समजतील. ?

ज० नमुना नंबर १२ चे वसूल बाकींत, नमुने नंबर ५।६।१२ मिळोन एक तेरीज केलें आहे त्यांत समजेल.

स० नमुना नंबर १२ यांत नमुने नंबर ५।६।१२ मिळोन वसुलाचें तेरीज केलें आहे त्याची एकंदर बेरीज कोठे कोठे मिळेल ?

ज० सरसालची वसूल बाकी नंबर २२ व सरकार खातें यांत मिळेल.

स० नमुना नंबर १२ यांतील नमुने नंबर ५।६।१२ मिळून तेरीज केलें त्याचे एकुण वसुलाचे बेरजेस आणि कीर्दीवरील बारमाही तेरजा खालीं वसुलाचा तपशील केला असतो त्यास, व सरकार खा

त्याचे बारमाही खर्चास, मेळ घालणें झाल्यास कोणकोणत्या रकमा मिळविल्या पाहिजेत ?

जं० १ कीर्दीचे बारमाही तेरजांतील दाखविले लावसूल इनाम जमाखर्चास दिन आहे सबब त्यांत इनामाची रकम वजा द्यावी म्हणजे बाकी राहिली बेरीज नंबर ५।६।१२ मिळून तेरजाचे एकुणाती स मिळेल.

२ सरकारखात्याचे एकंदर खर्चात इनाम-वअवल आहे त्याचें फाजील वजा देऊन नंबर ५।६।१२चे एकुणाती स मिळेल.

येणेप्रमाणें रकमा वजा केल्या पाहिजेत.

( सदरीं लिहिल्याप्रमाणें नमुन्यांवरून वजा बाक्या पाहण्यास नंबर १२चे नमुन्यास मेळ नाहीं याजकरितां कुळाचे खात्यांतील साल मजकुर जमाबंदी पैकीं वसुलाची निवड करून ती बेरीज नमुना नंबर १२ची समजून, नंबर ५।६ यांचे बेरजेंत मिळवून ताळ्याची खातरी करून घ्यावी.

# अंक १७

## नमुनानंबर २२ ह्मणजे सरसालचे वसूल बाकीविषयीं.

स० सरसालची वसूलबाकी कोणते कागदावरून करावी?

ज० खतावणीवरून करावी.

स० मुलकी बाकी तगाई सहित साल अखेरीस राहिली किती, त्यांत हप्ते ठरण्याची व हप्ते ठरले असून मुदत भरून येण्याची किती असें कोठें समजेल?

ज० सरसालचे वसूलबाकींत बाकीस तपशील केला असतो तेथें समजेल.

स० सरसालचे वसूल बाकीस बाकी काढली, ही खरी किंवा खोटी, हें पाहण्यास कोठें व कसा आधार आहे?

ज० नमुनानंबर ५।६।१२ या तिन्ही वसूल बाकीस बाकी काढली असत्ये त्या तिन्ही बाक्याची बेरीज सरसालचे वसूल बाकींतील बाकीस

मिळाली असतां नंबर २२ यांतील बाकीखरी असें समजावें, किंवा कुळवारी कडून येण्याकरितां ज्या रकमा सरकार खात्यांत जमा असतात त्यांचें तपशीलवार तेरीज करून खर्चीकडील भरणा वजा द्यावा, बाकी तपशीलवार बेरीज नमुनानंबर २२ यास मिळाली असतां सरसालचे वसूल बाकीची बाकी खरी समजावी.

स० नमुनानंबर २२ चे बाकींतील कोणंते तपशिलाच्या बेरजा अखेर आढाव्यांत नसून कोणत्या असतात ?

ज० खट बाकीवगैरे बाकीचा तपशीलनसून सालवार, बाबवार, तपशील सर्व असतात.

स० सरसालचे वसूल बाकीचा उपयोग काय ? व ती कशासाठीं करावीलागते ?

ज० साल अखेरीस बाकी किती राहिली याचा अखेर आढावा उतरण्याकरितां तयार करावीलागते- हा कागद अखेर आढाव्याचाकच्चा खर्डाच समजावा.

# अंक १८

## अरवेर आढाव्या विषयीं

स॰ अरवेर आढावा कोणत्या कागदावरून उतरतात. ?

ज॰ सरसालचे वसूल बाकीवरून उतरतात.

स॰ अरवेर आढावा उतरल्यानंतर पुढील सालीं त्याची व्यवस्था काय होत्ये. ?

ज॰ पुढील सालीं कीर्दीचे अवलीस फरकानें बेरजा कमज्यास्ती न होतां अवल आढावा उतरतात.

स॰ अरवेर आढावा खतावणीचे तेरजांत सामील असतो कीं नाहीं ?

ज॰ खतावणीचे तेरजांत असतो.

स॰ खतावणीचें तेरीज अरवेर आढावा उतरल्यानंतर करितात किंवा कसें. ?

ज॰ अरवेर आढावा उतरण्यापूर्वीं करितात.

स॰ कीर्दीचे एकंदर बेरजेस आणि खतावणीचे तेरजाचे बेरजेस मेळ असतो कीं नाहीं ?

ज० खतावणीन्चे तेरजांत अखेर आढाव्या दाख ल नसतो सबब मेळ असत नाहीं.

स० खतावणीचें तेरीज अखेर आढावा उत रण्यापूर्वीन्चि करावयान्चें कारण काय असावें?

ज० अखेर आढावा उतरण्यापूर्वी कीर्द खात्या न्वा मुकाबिला पाहावा नंतर अखेर आढावा उतरावा असें नमुन्यांतील कीर्दीन्चे समजुतीन्चे तिसरे कलमां त लिहिलें आहे.

स० (शब्दभेदानें)

अखेर आढावा खतावणीन्चे तेरजांत कां आणूं नये? ये विषयीं काय खुलासा लिहिला आहे?

ज० साल अखेर होतांच आढाव्यासाठीं कीर्द खात्यान्चा बारमाही मेळ पाहण्याची महकुफी हो ऊं नये, ह्मणोन कीर्दीवरील समजुतीन्चे तिसरे क लमांत लिहिलें आहे.

(नमुनानंबर २० व २१ हे नमुने पाहतांच समजुतींत येण्यासारखे असून ह्या दोन नमुन्यांत प्रश्न करण्याजोगे नाहींत सबब प्रश्न केले नाहींत.)

# नगदीप्रकरणीस माल.

# मुलकी प्रकरणीं.

## अंक १९

## चौवीस कलमांचे प्रतबंदी कायद्याविषयीं.

स० प्रतबंदी म्हणजे काय ?

ज० जमीनींच्या प्रती लावून त्यांस ठरावणें.

स० प्रतबंदी किती वर्षांनीं करण्याचा ठराव सरकारानें केला आहे ?

ज० तीस वर्षांनीं करण्याचा ठराव केला आहे; परंतु कारणपरत्वें अलीकडे पलीकडे ही होतें.

स० कोणीं मनुष्य एकादे नंबरांत हरएक प्रकारें मेहेनत अथवा खर्च करील. असा कीं विहीर किंवा तलाव खणून जिरायत जमीन बागायती करील, तर सदरहू अधिक उत्पन्ना बद्दल सरकारानें त्यापासून सारा अधिक घ्यावा कीं नाहीं ?

ज० कितीही अधिक उत्पन्न केलें तथापि ठरले

आकारापेक्षां ज्यास्ती सारा तीस वर्षें पर्यंत घेऊं नये कलम १ प्रमाणें.

स० प्रतबंदीर जिस्तरांतील नंबरांत जिरायत, बागाईत, तरी, अमुक अमुक एकर असें लिहिलें असतें, परंतु पाहाण्यांत लिहिले एकरापेक्षां अधिक बागाईत एकर तयार केले असें दिसून तसें शाबीत होईल, तर सारा अधिक घ्यावा कीं नाहीं?

ज० सारा अधिक न घेतां नंबरचे आकाराप्रमाणेच घ्यावा. (कलम १ व ४ अन्वयें.)

स० कोणते प्रकारचे नंबरांत झाडांचें उत्पन्न फार असल्यास कोणीं घ्यावें?

ज० लावणीचे नंबरांत असल्यास वाहणारानें घ्यावें व सरकारी पडितांत असल्यास सरकारानीं घ्यावें ........................................ कलम २

स० ज्या नंबरांत फार उत्पन्नाचे फळाचीं झाडें असून त्याचा दर प्रतबंदीचे वेळेस जिरायत लागला आहे, आणि तो नंबर पूर्वीपासून पडित असल्यामुळे दरसाल लिलाव करण्याची वहिवाट

चालत आली असेल, तर सदरहू नंबराची व्यवस्था कशी करावी.

ज० भतबंदी झाल्यानंतर प्रथम सालीं झाडें व फळें सुद्धां लिलाव करून पुढें नंबराचा आकार घेणेतो, ठ रलेद्रा प्रमाणे घ्यावा, परंतु झाडांची योग्य किंमत ला विली असून कोणी घेण्यास कबूल नसतील, तर चालत आल्या वहिवाटी प्रमाणें दर साल लिलाव करीत जावें.

कलम २ प्रमाणें.

स० नंबराचे आकारापेक्षां फळांचें उत्पन्न दरसाल फार ज्यास्ती असेल तर झाडासुद्धां लिलाव करावा कीं नाहीं. १

ज० भतबंदी कायद्याचे दुसरे कलमावरून प्रथम सालीं झाडांसुद्धां योग्य किंमत लावून लिलाव करावा असें होतें परंतु नफानुकसान पाहणें कलेकटरसाहेब यांजकडे आहे.

स० नंबराचे आकारापेक्षां फळांचे झाडांचें उत्पन्न फार कमी असून भतबंदी ठरल्यानंतर प्रथम सालीं झाडें लिलावांत घेण्यास कोणीं कबूल नसले कारणानें चालत आल्या वहिवाटी प्रमाणें फक्त फळांचें लिलाव करून उत्पन्न घेतले तरी पुढील सालींही झाडासुद्धां योग्य किंमत लावून लिलाव करावा किंवा कसें. १

ज० नफानुकसानपाहून काय करणें तें कलेक्टर साहेब यांणीं करावें. याबद्दल कायद्यांत खुलासा नाहीं.

स० लावणीचे नंबरांत फारउत्पन्नाचीं फक्त झाडें असतील, तर सदरहू झाडांचें लिलांव सरकारांतून करावें किंवा कसें.?

ज० लावणीचे नंबरांतील उत्पन्न वाहणारानें घ्यावें, त्यावर सरकारचा वारसा नाहीं (कलम २ प्रमाणें.)

स० कोणी मनुष्यानें एकसाल फळांसुद्धां झाडें लिलावांत घेऊन त्या नंबरांत तो लावणी करील तर लावणीचा आकार त्याजपासून घ्यावा किंवा नाहीं — घेतल्यास नंबरचे आकाराचे आंत लिलांव झाला असेल तर तो वजा जातां बाकी नंबरचा आकार राहील तो घेऊन नंबराचे आकाराची भरती करून घ्यावी, किंवा नंबरचे आकारापेक्षां लिलाव ज्यास्ती झालें असेल तो त्याचा त्यास परत द्यावा.?

ज० झाडे लिलावांत घेतल्यानंतर लावणीके त्यास नंबरचा भर आकार घेतला पाहिजे. जमीनीचें व झाडांचें उत्पन्न पृथक पृथक आहे सबब वहरदूचा निराळा आकार

किंवा पैसा घेतला पाहिजे.

स० कोणताही नंबर फार दिवस पडित असून जंगल झाल्यामुळें कोणी कमी आकारानें लावणीस मा गेल तर द्यावा कीं नाहीं ?

ज० नंबरांत जंगल असेल तथापि कमी आकारानें देऊं नये. ............................ कलम २ प्रमाणें.

स० नंबर लावणीस कबूल करून लावणी न करील तर आकार घेऊं नये कीं काय ?

ज० नंबराची कबुलायत लिहून दिल्यानंतर कूळ लावणी करो अगर न करो, नंबरचा भर आकार घेतला पाहिजे. असेंच वरचे कलमावरून होतें.

स० नंबर लावणीस कबूल केला असून त्यांत कांहीं थोडीशी जमीन तो लागण करील तर कुळा कडून कमी आकार घ्यावा कीं नाहीं ?

ज० भर आकार घेतला पाहिजे. तात्पर्य नंबर कुळानें कबूल केला ह्मणजे कुळाकडे त्या नंबराचा भर आकार चालू झाला.

स० नंबरांत नाकीर्दसार जमीन वजा जातां बाकी

राहिले कीं देसार जमीनीवर मात्र आकार ठरविला असतो परंतु कोणी नाकीर्देसार जमीनीत उत्पन्न करील तर अधिक सारा घ्यावा कीं नाहीं?

ज० अधिक सारा घ्यावयाचा नाहीं. नंबराचे आकाराप्रमाणेंच घ्यावा. (कलम ४।१ प्रमाणें)

स० कोणाचेही नांवें नंबर अथवा हिस्सा असून त्यांजकडून कोणतेही कारणानें जमीन काढवितां येईल कीं नाहीं?

ज० वाहणारा, नंबर अथवा हिस्साबद्दल आकार न देईल तरच त्याजकडून जमीन काढविली जाईल, परंतु वाहणारा जोंपर्यंत आकार देत आहे तोंपर्यंत कोणीही मुलकी अधिकारी जमीन काढूं शकणार नाहीं. (कलम ५ प्रमाणें.

स० कुळ, नंबराचा आकार देत नाहीं, व कायद्या अन्वयें त्याजकडून कलेकटरास जमीन काढवितां येत नाहीं. जमीन सोडवणें तर प्राप्त आहे तर कलेकटरास काय करावें?

ज० दिवाणीत फिर्याद करून जमीन सोडवावी.

स० कोणते एका जमीनीचा वाहाणारा मयत, अगर परागंदा होईल तर तीजमीन वाहण्यास कोणास द्यावी?

ज० तीजमीन त्याचा वडील पुत्र अथवा त्या वकचा वारस किंवा मुक्त्यार कबूल करील तर त्याचे नांवें दाखल करावी. ........................... कलम ६ प्रमाणें.

स० एकादे नंबरांत दोन हिःसेदार असून एक मेला, तर सदर हू हिःश्शाची व्यवस्था कशी करावी.

ज० कलम ६ प्रमाणें मयताचा हिःसा त्याचे वारस व मुक्त्यार वगैरेस वाहाण्या विषयीं पुसावें. ते नाकबूल करतील, तर दुसरे हिःसेदारास पुसावें, त्याणेंही नाकबूल केल्यास इतर रयतेस पुसावें तेही नाकबूल करतील तर राहिले हिःसेदाराकडून हिःसा सोडवून सर्व नंबर पडित दाखवावा. ........................... कलम ७ प्रमाणें.

स० एका नंबरांत दोहोंहून अधिक हिःसेदार असून त्यांतील एकजण आपला हिःसा सोडितो अथवा बिनवारस असून मरतो तर राहिले पडित हिःश्शाची काय व्यवस्था करावी?

ज० सदर हू हिःसा वाहण्यास बाकीचे हिःसेदारांस

पुसून ते सर्व मिळून कबूल न करतील किंवा अपसांत न समजतील तर ज्याचा हिःसा सर्वाहून मोठा असेल त्यास पुसावें, तो नाकबूल करील तर त्याहून लाहान हिःसेदारास पुसावें. याप्रमाणें शेवट पर्यंत पुसून कोणीच कबूल न करील तर इतर रयतेस पुसावें, तेही कबूल न करतील तर सर्व हिःसेदारां कडून हिःसे सोडवून सर्व नंबर पडित टाकवावा.......................(कलम ८ प्रमाणें.)

स० वनचराईचा नंबर मक्ता ठरल्यानंतर मक्तेदारां शिवाय तो नंबर दुसरा कोणी मनुष्य लावणीस मागेल तर द्यावा कीं नाहीं? दिल्यास खातें कोणाचें घालावें?

ज० सदरी लिहिल्याप्रमाणें नंबर मक्तेदाराचे सलो-ख्यानें देणे असल्यास देऊन मक्तेदाराचे खात्यांत नंबरचे भर आकाराप्रमाणें जमाबंदी येणें ठरवावी.

स० नंबर अथवा हिःसा दुसऱ्याचे नांवें दाखल करण्यास कोणी मनुष्य इच्छील तर दाखल करावा कीं नाहीं? व तो कोणते मुदती पर्यंत दाखल करावा.?

ज० नंबर सोडणाराचा राजिनामा व कबूल करणाराची कबुलायत घेऊन त्याचे नांवें दाखल करावा;

परंतु असा प्रकार लावणीपत्रक होण्यापूर्वी करावा. (कलम ९ प्रमाणें. ........................................

स० आपलेआपले नंबरांतील झाडें कापण्यास कोणकोणते लोक मुखत्यार आहेत. ?

ज० सबंध इनामीनंबर असेल तो मालक, जोडी इनामदार, ज्या नंबर वाहणाराचे कारकीर्दीत झाडेंउगवून तीं वाढत तोंपर्यंत एकसाहा नंबर लावणीस असेल तो, व नंबरची वहिवाट एकसाहां तीस वर्षेपर्यंत करितो तो. प्रत बंदीकायद्याचे दुसरे कलमांत लिहिल्याप्रमाणें झाडें लिलावांत घेतो तो. येणेंप्रमाणें लोक आपले आपले जमीनींतील झाडें कापण्यास मुखत्यार आहेत. कलम १० प्रमाणें.

स० कोणकोणते लोकांस झाडें तोडण्यास सरकारची आज्ञा घेतली पाहिजे. ?

ज० सदरील ह्मणजे कलम १० बद्दल प्रश्नोत्तरांत लिहिलेले मनुष्यांखेरीज सरकारीजमीनीचे वाहणारे अथवा मिराशी वजोडी इनामदार ज्यांचे जमीनीची वहिवाट सरकारांतून आहेतवकेलोकांस सरकारी आज्ञा घेतली

पाहिजे. (कलम ११ प्रमाणें.)

स० कोणते कामाकरितां झाडें कापण्यास कोणाची आज्ञा घ्यावी.

ज० पड अथवा लावणी जमीनींतील (जी लावणी जमीन नवीन वहिवाट करतो त्यास) शेतकीचे कामास लांकडें पाहिजे असल्यास पाटील कुळकरण्याचे आज्ञेनें कापणारांनीं अर्ज व हुकूमाचा दाखला ठेवून कापावीं. शेतकीचे कामाखेरीज जरूरीचे घर वगैरे कामास पाहिजे असल्यास माहालकरी किंवा मामलेदार यांचे आज्ञेनें दाखला ठेवून कापावीं. उदीम करण्याकरितां कापणें झाल्यास कलेकटर किंवा असिस्टन्ट कलेकटर यांचे हुकुमावरून कापावीं. सदरहू बद्दल नफ्याची कलमबंदी कलेकटर साहेबास वाजवी दिसेल त्या प्रमाणें ठरवावी. ..................(कलम ११ प्रमाणें.

स० सदरीं लिहिले मनुष्यांनीं हुकूम घेऊन किंवा न घेतां झाडें कापिलीं आणि कलेकटर साहेब कापिलेले झाडाबद्दल माफी न करतील तर झाडांचें नुकसान कसें भरून घ्यावें. १

**ज०** जितकीं झाडें कापतील त्यांचे दुपट ह्मणजे प्रत्येक झाडांस दोन दोन झाडें लावून द्यावीं.

**स०** एकेनंबरांत दाहा झाडें असून हुकुम घेऊन किंवा नघेतां कापिलीं व कलेकटर साहेब यांणीं माफीन केली तर वीस झाडें लावून द्यावीं परंतु त्याच नंबरांत वीस झाडें न होण्याजोगी जागा असेल तर कसें करावें.?

**ज०** सदरी लिहिल्याप्रमाणें जागा नसल्यास राहिलीं दाहा झाडें दुसरे सरकारी पड नंबरांत लावून द्यावीं; परंतु असें करण्यास प्रतबंदी काय यांत कलमना हीं यास्तव कलेकटर साहेब यांणीं अशा प्रकारची नुकसान न होण्याविषयीं ठराव करावा.

**स०** कोणाचीही सरकारी जमीन मिरासी खेरीज असून त्या जमीनीस हिःसेदार वाहण्यास उभे राहतील तर द्यावी कीं नाहीं? दिल्यास कोणकोणते प्रकारें कशी द्यावी? आणि तो नंबर कसा असावा.?

**ज०** पड जमीनींत हिःसेदार वाहण्यास उभे राहतील तर हिःशानें द्यावी; परंतु एकाचे हिःशाचे रुपये दाहाहून कमी न होत असा नंबर असेल तोच दोन किंवा अधिक हि:

सेदारांस द्यावा. वीसरुपयांहून आकार कमी असल्यास एकाचेच नांवें नंबर दाखल करावा. कलम. १२ ..........

स० पडित नंबर पैकीं काहीं हिःसा वाहण्यास कोणी मागेल तर द्यावा कीं नाहीं.?

ज० हिःसा वाहण्यास न देतां कुळाची नंबर वाहण्याची खुषी असेल, तर सबंध नंबर कबूल करून भर आकार देईल तरच त्यास द्यावा. कलम. १२ ..................

स० कितीएक प्रतबंदी नंबर ज्यांत दाटजंगल झाल्यामुळें लावणी करतां येत नाहीं सबब दरबस विला नाहीं. त्या नंबरांत जर कोणी मनुष्य हरएक प्रकारें मेहेनत अथवा खर्च करून जमीन लागण करील तर त्या केलेल्या कीर्दसार जमीनी बद्दल आकार घ्यावा कीं नाहीं.? घेतल्यास कसा, कोणते रितीनें घ्यावा.?

ज० सदरी लिहिल्या प्रमाणें लावणी केली असेल तर गांवांत तशीच जमीन जेथें असेल तिचे ठरले आकारा अन्वयें सदरहू जमीन मोजून आकार घेतला पाहिजे. कलम १३ प्रमाणें. ..............................

स० (वहिवाटीसंबंधी) फार उत्पन्नाचे गवता-

च्या लिलाव मामलेदार याणीं आपले अकत्यारींत करावा, कींनाहीं? नसल्यास कोणीं करावा?

ज० पांचशें रुपयांचे आंत मामलेदार यांणीं करावा, याहून ज्यास्ती उत्पन्न होईल असें दिसल्यास त्याचा लिला कलेकटर साहेब यांणीं करावा. (कलम १४ प्रमाणें.

स० कुरणाचे ह्मणजे चांगले गवताचे नंबरा खेरीज बाकी पड नंबरांतील गवताचा लिलाव नंबरचे आकारा पेक्षां ज्यास्ती होईलतर होऊं द्यावा कींनाहीं? व सदरहू पड नंबरचा लिलाव कधीं करावा?

ज० पड नंबरचा लिलाव पावसाळ्याचे आगोदर करावा तो नंबरचे आकारापेक्षां ज्यास्ती होऊं देऊं नये. कलम

स० एक गांवांतील नंबराचे लिलावास दोन गांवचे लोक येऊन दोघांचेंही बोलणें समान पडेल तर लिलाव कोणास द्यावा?

ज० ज्या गांवचा लिलाव असेल तेथील राहणारास द्यावा; परंतु नंबरचे आकाराचे आंत परगांवचा मनुष्य ज्यास्ती बोलेल तरच त्यास द्यावा. कलम. १४ .......

स० नंबरचा कोणते दरजेपर्यंत लिलाव झाला अ

सतां मक्तेदारास लावणी दाराप्रमाणें करण्यास अडच
ण नाहीं.

ज० लिलावांत भर आकार लिलाव झाला असतां
मक्तेदारांस लावणीदाराप्रमाणें जमीन लागण वगैरे क
रण्याचा उपभोग करण्यास अडथळा नाहीं. कलम १४

स० कुरणाचे ह्मणजे चांगले गवताचा लिलाव नंब
राचे आकारापेक्षां ज्यास्ती होईल तर होऊं द्यावा कीं
नाहीं?

ज० सदरहू लिलाव कितीही चढला तत्रापि हरक
त नाहीं. कलम १५ प्रमाणें. ..........................

स० नाकीर्दसार ह्मणजे गायरान वगैरेंतील गव
ताचा लिलाव करावा कीं नाहीं? केल्यास कितीगवताचा
लिलाव करावा.?

ज० गांवांतील गुरें चारणीपुरती पूर्वापार चालत
आल्या वहिवाटीप्रमाणें गवतीजमीन ठेऊन बाकी गवता
चा लिलाव करावा तो कितीही चढला तत्रापि हरकत
नाहीं. कलम १६ प्रमाणें.

स० कोणी मनुष्यानें लावणीचे नंबरांत घर बांधि

त्यानंतर नंबर सोडिला असतां सदरहू घरावर सरकार वारसा करूं शकेल कीं नाहीं ?

ज० सरकार वारसा करूं शकणार नाहीं. पूर्वी घरावर वारसा करण्याची सरकारांतून वहिवाट होती; परंतु हल्लीं सनदबंदी कायद्या अन्वयें वारसा करण्याविषयीं ठराव नसल्यामुळें वहिवाट नाहीं. कलम. १७

स० इनामी नंबरांत इनामदारानें घर बांधिल्यानंतर कांहीं कारणानें सदरहू इनाम सरकारांत आल्यास त्यांतील घरावर इनामदाराचा वारसा राहील कीं नाहीं ? किंवा इनामदाराचे घराची व्यवस्था कुळाचे घराप्रमाणें असते कीं काय ?

ज० कुळाप्रमाणें ठराव इनामदारास लागू नाहीं; ह्मण जे इनामदाराचा वारसा नाहीं ते व्हां अर्थातच सरकारानें तें घर घ्यावें. कलम १८ प्रमाणें. .......................................

स० इनामदार अथवा जोडी इनामदार दुसऱ्यास नंबर वाहण्यास देतील तर सनदबंदी आकाराप्रमाणेंच दिला पाहिजे कीं काय ?

ज० इनामदार मुखत्यार आहे. कलम १८ प्रमाणें.

स० इनामजमीन कांहींकारणामुळें जप्तीत आलीत र त्यांतील जमीनीबद्दल कुळाकडून वसूल घेणें तो कसा करसा घ्यावा? मतबंदी आकाराप्रमाणेंच घेतला पाहिजे कीं काय?

ज० इनामदाराशीं वाहणाराचा जसा करार ठरला असेल त्याप्रमाणें एक वर्ष पर्यंत घेऊन दुसरे सालापासून मतबंदी अन्वये वसूल घ्यावा. कलम १९ प्रमाणें.

स० इनामजमीन सरकारांत आली ती पडित असत्यास कसें करावें?

ज० सरकारी पडित नंबराप्रमाणें लिलाव करावा तो प्रथमसालीं कितीही वाढलात त्यापि हरकत नाहीं; परंतु पुढें नंबरचे आकाराचे आंत किंवा भर आकार घ्यावा. (सरकारी पडित नंबराप्रमाणें) असें कलम १९ यावरून होत आहे.

स० इनामजमीन कांहीं कारणामुळें सरकारांत आली ती जर कोणी दुसरे सालीं वाहण्यास मागेल तर कोणते आकाराप्रमाणें ती द्यावी.

ज० मतबंदी आकाराप्रमाणेंच द्यावी. कलम १९ प्रमाणें.

स० ज्यास राजिनामा किंवा कबुलायत देणें असेल त्याणें कोणते मुदतींत हीं द्यावीं ?

ज० तारीख १ मे चे आगोदर म्हणजे तारीख ३० एप्रिल रोजीं कुळांनीं राजिनामें व कबुलायती द्याव्या; परंतु कबुलायती लावणीपत्रक होई पर्यंत चालतात अशी वहिवाट आहे. कलम २० प्रमाणें. ..........................

स० राजिनामे व कबुलायती झाल्यानंतर तीं बुकें पाटील कुळकरणी यांणीं कोणाकडे पाठवावीं ?

ज० सदरहू गांव पेट्यांतील असल्यास माहालकरी याजकडे व ठाण्यांतील असल्यास मामलेदार याजकडे तीं बुकें पाठवावीं. कलम २० प्रमाणें.

स० ज्या तालुक्यांत फारकरून खरीपाचें पीक होतें तेथें वसूल किती हप्त्यांनीं घ्यावा ? व ते हप्ते कोणते ?

## जबाब.

१ तारीख १५ डिसेंबर. १ तारीख फेब्रुआरी.
१ तारीख. १५ मार्च. १ तारीख. १ मे.

४ येणेप्रमाणें च्यार हप्त्यांनीं वसूल घ्यावा. .......

स० ज्यातालुक्यांत खरीप व रबीचें पीक समान आहे अथवा रबी ज्यास्ती आहे तर तेथें किती हप्त्यां नीं वसूल घ्यावाव ते हप्ते कोणकोणते.?

## जबाब.

१ तारीख १५ ज्यानेवारी. १ तारीख १ मार्च.

१ तारीख १५ एप्रिल १ तारीख १ ज्यून.

येणेंप्रमाणें च्यार हप्त्यांनीं घ्यावा.

स० लावणी व पडित नंबरांतील बांधवरोळया किंवा आरण्या बिघडतील तर कोणीं कोणत्या घालाव्या.?

ज० लावणी जमीनींतील वरोळया वाहणाराकडून दुरुस्त करण्यास घालवाव्या व पडित नंबरांतील सरकारांतून घालाव्या. कलम २२ प्रमाणें.

स० पडितनंबरांच्या वरोळया घालण्यासाठीं सरकारांत किती रुपये नेमिले आहेत त्यांपैकीं खर्च केल्यावर ज्यास्ती खर्च लागल्यास काय करावें?

ज० बांधवरोळयाकरितां तालुक्यास १०० शंभर रुपये नेमिले आहेत त्यांपैकीं खर्च करीतजावा. ज्यास्ती लागल्यास कलेक्टर साहेबांचे हुकुमावरून मामलेदार

यांणीं खर्च करून वगैरे त्या दुरुस्त कराव्या, असा कलम २२ यांत अर्थ आहे परंतु अशी वहिवाट हल्लीं नसून जो खर्च लागेल तो मुलकी खेरीजखाते खर्चीं लिहून घालितात.

**स०** नंबर वाहणारानें नंबराच्या खुणा नागरून किंवा हरएक प्रकारें नादुरस्त केल्या, तर त्याणें कशा दुरुस्त कराव्या? आणि त्याणें हुकुमानें दुरुस्त न केल्यास काय करावें?

**ज०** ज्या दोन बांधांमध्यें बांधाची पट्टी बिघडली असेल त्या नंबराचे वाहणारानें एक हात उंच सवा हात पट्टीचा बांध घालावा. हुकुमा अन्वयें मुदतीचे आत दुरुस्त न करील तर गांवचे अधिकाऱ्यानें मामलेदाराकडे रिपोर्ट करून संन १८४६ इसवीचा कायदा ३ प्रमाणें नोटीस लावावी आणि तसेंही करून त्याणें बांध नीट न केल्यास सरकारांतून बांधकामाकडे रुपये नेमिले त्यापैकीं खर्च करून कायद्या अन्वयें मजुरीचा त्यापासून आकार भरून घ्यावा. कलम २२ प्रमाणें. ......

**स०** बांधदुरुस्तीची तपासणी कशी पाहावी?

ज० सर्व रीति सांगितली असतां विस्तार फार होईल सबब ज्याइन्ट रुळींतील कलम २३ यांत सांगितल्याप्रमाणे तपासणी करावी.

स० बांध तपासणीचे कारकुनाने जाहीरनामा कधीं कोणास वाचून दाखवावा?

ज० तपासणी सुरू करण्यापूर्वी गांवची सर्व कुळें बोलावून आणून त्यास तो वाचून दाखवावा. कलम २३ प्रमाणें.

स० कलम २४ यांत मतलब काय आहे?

ज० तपासणीचा नक्का कसा तयार करावा, आणि नक्का तयार केल्यानंतर कलेकटर साहेब यांजकडे पाठवावा.

---

## अंक २०

मेहेरबान विंगिट साहेब बाहादूर रेविन्यूसरवेचे कमिशानर यांणीं जमीनी विषयीं सोळा कलमांचा कायदा ठरविला आहे त्याप्रकरणीं समजुतीस्तव थोडो

शीं प्रश्नोत्तरें खालीं लिहिलीं आहेत.

स० दगडाची लांबी किती असून तो जमीनींत किती असावा व त्यास खूण कशी करावी.?

ज० दगडाची लांबी दोन हात असून निमे जमीनींत असावा व बाकी वर राहिलेला दगड चुन्यानें पांढरा करावा. कलम १ प्रमाणें.

स० मातीचे किंवा दगडांचे वरोळ्यांची लांबी, रुंदी व उंची किती असावी ?


जाबाब.

लांबी हात ४ रुंदी हात २. उंची हात ॥। माथ्यावर रुंदी हात ॥ येणेंप्रमाणें असावी. (कलम १ प्रमाणें.

स० नंबराचे चार कोंपऱ्यांच्या खुणा कशा असतात व त्या किती प्रकारच्या आणि कशाच्या केलेल्या असतात? त्या दोहीं प्रकारचे स्पष्ट समजुतीस्तव नकाशा म्हणून उत्तर देणें तो नकाशा पुढील पृष्ठावर लिहिला आहे.

# जबाब.

दगडाचे खुणेचा नकाशा दगडाची खूण. वरोळ्यांचे खुणेचा नकाशा तिची खूण.




येणेप्रमाणें खुणा असतात. (कलम २ प्रमाणें.)

स० सदरी दाखविलेले नकाशावरून नंबराचे कोपऱ्यास खुणा असतात असें साफ दिसतें; परंतु एकादे ठिकाणीं नंबराचे लांबीमध्यें ही खुणा येतील कीं नाहीं.

ज० नंबर चौकोनी असून फार लांब असेल तर बारा सांखळ्यांपासून चोवीस सांखळ्यापर्यंत लांबीचे सरासरी निमेवर एक वरुळी अथवा दगड हद्दीचे शिस्तींत असावा व कोपऱ्याचे खुणेचे दरम्यान चोवीस सांखळीवर अंतर असल्यास दाहा किंवा बारा सांखळ्यांचे अंतरानें हद्दीचे शिस्तींत दोन वरुळ्या किंवा दगड असावे, कदाचित् नंबरास मोठा बांक असेल तेथेंही एक दगड लावावा असा रुळींत ठराव असले कारणानें

होईल. (कलम ३ प्रमाणें)

स० नंबरचे हद्दीवर नाला, नदी, मोठा पाट, कुप ग, बांधोरा, (मोठाबांध) असेल तर नंबरच्या हद्दी कळण्यास्तव दगड किंवा वरोळ्या घालाव्या की काय?

ज० सदरीं लिहिल्याप्रमाणें खुणा नंबराचे हद्दीवर असल्यास वरोळ्या किंवा दगड पुरण्याची जरूर नाहीं. कलम ४ प्रमाणें.

स० नंबराचे हद्दीवर नाला, पाट, वगैरे कोणी वाहणारा बांधील तर त्यास हरकत आहे की काय? असल्यास तें बांधण्या विषयीं त्यास सरकारानें परवानगी द्यावी कीं नाहीं?

ज० नंबराच्या वाहणारा बांधील तर त्यास सरकारांतून हरकत न करितां परवानगी द्यावी. कलम ४ प्रमाणें.

स० जेथें लवणाची अगर पूर येऊन वाहून जाण्या जोगी जागा असेल, तेथें किंवा नंबर लाहान असून त्यांत मातीच्या वरुळ्या घातल्या असतां जागा आटत्ये त्या ठिकाणीं हद्दी समजण्या साठीं काय करावें?

ज० दगडाच्या खुणा करण्या विषयीं मामलेदार यां

णीं हुकूम द्यावा; परंतु हा प्रकार अशा जाग्याशिवा य दुसरे ठिकाणीं होऊं नये. कलम ५ प्रमाणे.

स० प्रतबंदी काय घांतील ते विसावे कलमा प्रमाणें बांधांची तपासणी करते वेळेस बरोळया दुरुस्त नादुरुस्त आहेत असें कशावरून समजावें? त्या दुरुस्त नसतील तर किती उंच केल्या पाहिजेत वगैरे.

ज० बरोळया दीड हातांपेक्षां उंचीस कमी असल्यास नादुरुस्त समजून सवा दोन हात उंच करवून त्यावरील दगड चुन्यानें पांढरे करावे. कलम ६ प्रमाणे.

स० सदरीं कलम २।३।४ यांचे प्रश्नोत्तरांत लिहिले खुणांपेक्षां ज्यास्ती खुणा असतील तर त्या दरसाल तपासणीचे वेळेस दुरुस्त कराव्या कीं नाहीं?

ज० ज्यास्ती खुणा दुरुस्त न करितां नवाच झाडूं याव्या त्या (बांध, पाट, कुपण, इत्यादि) तपासणीचे रजिस्टरांत देखील दाखल करून घेत. कलम ७ प्रमाणें.

स० जर एकादी नादुरुस्त बरुळी आठ हातांपेक्षां भरवगैरे पडले कारणानें लांब झाली असेल तर ती तपासणीचे वक्तीं सगळी दुरुस्त करावी कीं नाहीं.?

ज० सगळी दुरुस्त न करितां आठ हातच करावी. कलम ८ प्रमाणें.

स० हरएक गांवीं वरुळया आहेत तेथें पाटील कुळकरणी यांणी पाहणीचे वेळेस वरुळ्या दुरुस्त आहेत हें कशावरून पाहात जावें ?

ज० पाहणीस जाते वेळेस वरुळया मोजून पाहण्याकरितां.

१ आठ हातांचा गज. १ चार हातांचा गज.

१ सवादोन हातांचा गज. १ पाउण हातांचा गज.

येणेप्रमाणें गज बाळगीत जावे. कलम ९ प्रमाणें.

स० कलम १० यांत काय हांशील आहे.

ज० जिरायत नंबरांत हद्दी स्पष्ट होण्याकरितां खुणांच्या शिस्तींत जी जागा खुली असल्ये ती जागा दोन हातांपासून तीन हात पर्यंत रुंदीची पट्टी ठेवून त्यावर गवत झुडुपें वगैरे वाढूं द्यावीं व बागाईत किंवा तरी जमीनीस बहुत करून हद्दी स्पष्ट असतातच, नसेल तेथें एक हात रुंदीची पट्टी सोडून चांगली हद्द केली पाहिजे.

स० सदरचे सर्व ठराव कोठे लागू आहेत ?

ज० रिविन्यू सरवेचें काम चालू होतें तेव्हां किंवा सरवे पुरी झाल्यावर ज्या गांवांत सरवे चे कायद्याप्रमाणें हद्दी तयार झाल्या असतील त्या सर्व गांवास सदरहू कलमें लागू आहेत. कलम ११ प्रमाणें.

स० जे थें बांधान्च्या खुणा असतील तेथें कलम १० पावेतों ठराव लागू होतात; परंतु जेथें सरवे (पैमाष) ठरली असून नंबरच्या हद्दी ठरल्या नाहींत तेथें हद्दी ठरावणे त्या कोणी ठरावाव्या?

ज० कलेकटर साहेबांनीं ठराव करावा. कलम १२ प्रमा

स० सदरीं कलम १ ता गाईत ९ पावेतों कलमें ज्या गांवास लागू नाहींत ह्मणून ठरलें त्या गांवांत हद्दीन्च्या खुणा कशा जपून ठेवाव्या?

ज० कलम १० यांत सांगितल्याप्रमाणें सर्व ठिकाणीं वहिवाट करावी. कलम १३ प्रमाणें.

स० ज्या नंबराचे हद्दी विषयीं तक्रार पडून मामलेदार यांणीं फैसल केला त्या जाग्यान्चा पुनः तंटा न पडण्या विषयीं काय केलें पाहिजे?

ज० कलम २।३ यांत लिहिल्याप्रमाणें तंटयाचे

जागीं दगड रोंखिले पाहिजेत. कलम १३ प्रमाणें.

स० सरकारी पडनंबराच्या वरोळया कोणीं दुरुस्त कराव्या.?

ज० सरकारांतून केल्या पाहिजेत. कलम १४ प्रमाणें.

स० कदाचित कलेक्टर साहेब यांस असें वाटलें कीं पडजमीनीच्या वरोळया वनचराईचे मक्तेदाराकडुन दुरुस्त करवीत जाव्या तर कलेक्टरांनीं काय केलें पाहिजे.?

ज० वनचराईचे मक्तेदाराचे करारनाम्यांत मक्त्याचे बेरजे शिवाय वरोळ्या नीट करून देऊं ह्मणोन कलम लिहून घ्यावें आणि जेणेंकरून मक्त्याचे पैशां त तोटा नयेई तें करण्याकडे लक्ष पुरवावें. कलम १४ प्रमा०

स० सरकारी पडनंबराच्या हद्दी दुरुस्त करण्यास खर्च लागेल तो कोणीकडुन करावा.?

ज० दर हजार एकरास रुपये ५ प्रमाणें वनचराईचे उत्पन्नांतून कापून १०० रुपये पावेतो अमानत जमा करून ठेवून त्यापैकीं खर्च करीत जावा. कलम १५ प्रमाणें.

स० सदरीं सांगितल्याप्रमाणें दर हजारीं रुपये ५ प्रमाणें कापून रुपये अमानतींत ठेविले त्यापैकीं खर्च हो

ऊन बाकी राहिल्यास ती पुढील सालची याच प्रकारची अमानत होईल. त्यांत जमा करून त्यापैकीं खर्च करावा किंवा कसें.?

ज० सदरीं लिहिल्याप्रमाणें न करितां दर सालची वेगळाली अमानत करून त्या पैकीं खर्च करीत जावा. कलम १५ प्रमाणें.

स० सदरीं लिहिलेले अमानती पैकीं शिलक राहिल्यास सालअखेरीस त्याची व्यवस्था कशी करीत जावी. ?

ज० अमानतखर्चे लिहून जमीन बाबेस जमा करावे.

(बांधवरूळयाकडे कोणते प्रकारें कोणीकडून खर्च करीत जावा ह्मणून वर प्रश्नोत्तरें लिहिलीं हीं फक्त रूळींतील अर्थ समजण्यास्तवच लिहिलीं आहेत; परंतु हल्लीं तशी वहिवाट नसून रोखतसलमातीस खर्च पडून नंतर मुलकी खेरिजास पडतो.)

स० बांधदुरुस्तीकडे नेमिले ऐवजा पैकीं खर्च करणें झाल्यास कोणते मुदती पर्यंत करावा.?

ज० तारीख १९ ज्युलई पर्यंत करावा. कलम प्रमाणें १५

स० बांधदुरुस्तीकडे नेमिलेऐवजाहून ज्यास्ती खर्च लागल्यास कसें करावें.?

ज० कलेकटर साहेब यांणी दर हजारीं रुपये १० प्रमाणें कापून खर्च करावा; परंतु ज्यास्ती झालेले खर्चीबदल तक्ता किंवा पत्र रिविन्यू कमिशनर यांजकडे पाठविलें पाहिजे. कलम १६ प्रमाणें.

स० वरुळया दुरुस्त करण्याकरितां लावणीदारास माती पाहिजे ती त्याणें वरुळयांनजीक खणावी कीं नाहीं.? खणिल्यास काय हरकत आहे?

ज० वरुळयांजवळ माती खणिली असतां पावसाचें पाणी सांचून वरुळया खराब होतील सबब नजीक न खणितां दोन हात जागा आजूबाजूस टाकून खणावी. कलम १७ प्रमाणें.

स० मामलेदार किंवा अवल कारकून यांणीं बांधाची तपासणी केल्यावर कोणी तपासणी करावी.?

ज० कलेकटर किंवा आसिस्टन्ट कलेकटर ज्यांचे ताब्यांत तालुके असतील तेथील त्यांणीं तपासणी करावी. कलम १८ प्रमाणें.

स० कलेकटरावांचून दुसरे कोणी तपासणी केल्यास हरकत आहे कीं काय? आणि ते तपासणीदार कोणते हुद्याचे असावे?

ज० दप्तरदार किंवा नायब दप्तरदार अगर विश्वासू हुद्देदार यांणीं केली तरी हरकत नाहीं. कलम १८ प्रमाणें.

स० कलम १९ यांत काय हवाला आहे.?

ज० रिविन्यू कमिशानर यांणीं प्रांतांत फिरते वेळेस ज्याइन्ट रपोर्टांतील कलम ८४ रकम २३ प्रमाणें वहिवाट चालत्ये की नाहीं, तें पाहून कम ज्यास्ती वाटल्यास बंदोबस्त नजरेनुरूप करावा.

स० दोन नंबर लागण असून त्याचे दरम्यानचे बांधावर एक झाड मोठें वाढलें तें तोडण्या विषयीं दोघे वाहणारांचा तंटा पडला आहे तर तें झाड कोणास द्यावें?

ज० ज्याचे नंबरांत छाया बहुत पडून पीक नुकसान होतें त्यास द्यावें. कदाचित दोघांचेही नंबरांत समान छाया पडून खराबी होत असेल तर दोघांस सारखें वांटून द्यावें अथवा सरकारांतून लिलाव करावा. (ये विषयीं कायद्यांत खुलासा नाहीं.)

# मुलकीनमुन्याप्रकरणीं.

## अंक २१

### मुलकीसंबंधींनमुनेकितीवकोणते.

स० गांवच्चे एकंदर नमुने बावीस, पैकीं मुलकी संबंधीं वहिवाटीविषयीं नमुने कोणकोणचे ठराविले आहेत व त्यांचींनांवेंकाय?

## जबाब.

१ शेतवारपत्रक नंबर ६ ......

१ लावणीकमज्यास्तीचें टिपण नंबर ७ ..........

१ गवतीजमीनीचेंपत्रक नंबर ८

१ लागणपडीचेंपाहणीपत्रक नंबर ९ ..........

१ लावणीपत्रक नंबर १०

१ जामीनपत्रक नंबर ११

१ लावणीकमज्यास्तींतील

८ तक्रारीचीकैफियत नंबर १२

१ कुळवारजमाबंदीकमज्यास्तीपत्रक नंबर १४ ....

१ सरसालच्याएकंदरठराव बंद नंबर १५ ........

१ पीकजप्तीचीनोंद नंबर १६

१ रपोटाचानमुना नंबर १७

१ जावकबारनिशीनंबर १८

१ आलेकागदांचेफेरिस्त नंबर १९

८ नमुने १३ असत.

स० सदरी लिहिलेनमुने यांचा कोणते नमुन्याचा काय उपयोग व कशाकरितां करावे लागतात.?

ज० (त्याचा प्रकार लिहिला असतां फारच विस्तार होईल सबब) नमुन्याचे आरंभीं फेरिस्त आहे तेथें पाहावें ह्मणजे समजेल.

---

## अंक २२

### शेतवार पत्रक नमुना नंबर १

### याप्रकरणीं.

स० शेतवार पत्रकास काय समजतें व हा कागद दरसाल होतो कीं नाहीं.?

ज० एकंदर गांवांत नंबर किती, त्यांत जिराईन, बागाईन, आकारएकर, वगैरे चतुःशिमासहित कसे आहेत वगैरे सर्व आहवाल समजतो. हा गांवचा मुख्य कागद होय. सदरहू कागद दरसाल न होतां प्रनत्रदीचे

वेळेस एकवार होतो.

स० गांवांत एकंदर नंबर किती व प्रत्येक नंबर सरकारी किंवा इनामी, मिराशी किंवा गतकुळी वगैरे तपशिलासह बिघे किंवा एकर आकाराची बेरीज नंबरवार व एकंदर अशी कोठें समजेल?

ज० शेतवार पत्रकांत समजेल.

स० अमुक नंबरचे अमुक बाजूस अमुक खूण आहे असें कशावरून समजेल?

ज० शेतवार पत्रकांत चतुःशिमेचा तपशील दाखविलेला असतो तेथें समजेल.

स० प्रत्येक नंबराची जमीन किती, मामुल बिघे व मोजणी एकर पैकीं खराब वजा जातां बाकी काय राहिली, त्यांत जिराईत, बागाईत, तरी, यांस कोणते दरानें काय आकार झाला हें कोठें समजेल?

ज० शेतवार पत्रकास समजेल.

स० गांवचा एकंदर रकबा किती, पैकीं एकंदर खराब वजाजातां बाकी राहिली जमीन किती, त्यांत इनाम व सरकार खालसा किंवा मिराशी असें एकंदर

तपशिलानें एकर किती असें कोठें समजेल?

ज० शेतवार पत्रकांतील पोटकागद गोषवारा आहे त्यास समजेल.

स० सरकारी, इनामी, मिराशी, गतकुळी, गायरान वगैरे गांवांत किती नंबर आहेत असें एकंदर एके ठिकाणीं कोठें समजेल.?

ज० शेतवार पत्रकांतील पोटकागद गोषवारा आहे त्यांत समजेल.

स० गांवचे मामूल बिघे व मोजणी एकर किती असें कोणत्ये ठिकाणीं समजेल.?

ज० शेतवारपत्रक, गोषवारा, जमाबंदीचिठा यांत समजेल.

स० शेतवार पत्रकांतील कीर्दसार जमीनीचे आकाराची व काईम ठरावाची बेरीज मिळेल कीं नाहीं?

ज० काईम ठरावाची बेरीज धरसोडीची असून कीर्दसार जमीनीची बेरीज आकारा अन्वयें असत्ये सबब मिळणार नाहीं.

स० अमुक नंबरांत अमुक झाडें किंवा विहिरी

ठरलेल्या अमुक असें कोठें समजतें?

ज० शेतवारपत्रकांतील शेऱ्याचे कोष्ठकांत समजतें.

स० गांवीं शेतवारपत्रक तयार झालें नसेल किंवा हारवलें असेल तर तयार करण्यास कोणकोणते कागद पाहिजेत?

ज० गांवचें रजिस्टर बूक, तें नसल्यास सूड व नकाशा यावरून तयार करावें.

## अंक २२

## लावणीकमज्यास्ती टिपण नमुनानंबर ७ याविषयीं.

स० नमुना नंबर ७ चें कमज्यास्ती टिपण कोणते उपयोगासाठीं करावें लागतें?

ज० गुदस्त खतावणी अन्वयें कुळाचे नांवें जमाबंदी बार करण्यास व नमुना नंबर १४ यास कमज्यास्ती करण्यासाठीं करावें लागतें.

स० कोणी वाहणारानें नंबराचा राजिनामा दिल्यास तो कोणते कागदीं कोणीकडे नमुद करावा·

ज० नंबर ७ चे टिपणांत कमीकडे नमुद करावा·

स० कोणी मनुष्यानें नंबर वाहण्या विषयीं कबुलायत दिली तर कमज्यास्ती टिपणांत कोणीकडे दाखल करावे ?

ज० नमुना नंबर ७ यांतील ज्यास्तीकडे दाखल करावें·

स० साल मजकुरीं अमुक कुळानें नंबर सोडून अमुक मनुष्यानें लावणीस घेतला किंवा न घेतला असें कोणते कागदांत समजेल ?

ज० नमुना नंबर ७ चे कमजास्ती टिपणास कमीकडे समजेल·

स० सालमजकुरीं मक्ता वगैरे बाबतीस गुदस्तपेक्षां कमी किंवा ज्यास्ती काय काय झालें हें कोठें कोठें समजेल ?

ज० नमुना नंबर ७ व नमुना नंबर १४।१५ यांत समजेल·

स॰ नमुनानंबर ७ चे टिपणांतील कुळवार वगैरे कमज्यास्तीची बेरीज कोणते कागदास मिळेल?

ज॰ कुळवार जमाबंदी कमज्यास्ती पत्रक नमुना नंबर १४ यास मिळेल.

स॰ नमुनानंबर ७ चे कमज्यास्ती टिपणांतील कमज्यास्तीची एकंदर बेरीज नमुना नंबर १५ चा सरसालचा ठरावबंद यांतील कमज्यास्तीस मिळेल कीं नाहीं?

ज॰ नमुना नंबर ७ यांत एक कुळानें नंबर सोडिलेला दुसऱ्यानें घेतला असें मुबादल्याचे कमज्यास्ती येतें आणि नंबर १५ यास निवळ कमी व ज्यास्ती येतें या कारणानें मिळणार नाहीं.

स॰ नमुना नंबर ७ यांतील निवळ कमज्यास्तीची बेरीज कोठें मिळेल?

ज॰ सरसालचे ठरावबंदास मिळेल.

स॰ कारकुनांचे वगैरे पाहणींत छपावणीनें लागण केलेला नंबर कोणता किती एकर आकाराचा कोणाकडे निघाला हें कोणकोणत्ये ठिकाणीं समजेल?

ज० नमुनानंबर ७ नमुनानंबर १३ व कुळाचेरवा त्यांत, येणेप्रमाणें तीन ठिकाणीं समजेल.

स० मक्ते वगैरे बाबतीचे कमज्यास्ती केव्हां करीत असतात ?

ज० मक्ते झाल्यानंतर एकंदरीनें बाबवार कमज्यास्ती करितात.

स० कोणी मनुष्यानें पडितनंबर लिलावांत घेतला तो कमज्यास्ती टिपणांत दाखल केल्यानंतर मक्तेदार नंबर लागण करील तर कमज्यास्ती टिपणांतील कमीतून काढण्या विषयीं कसें केलें पाहिजे व तो ज्यास्तींत कसा दाखल होईल ?

ज० कमीचे टिपणांत मक्ता बाबी किंवा वनचराई पैकीं पडितनंबर लागण केला त्याचे लिलावाचा आकार उजवे हाताकडे खर्च झाल्या प्रमाणें लिहून ज्यास्तींत नंबरचा भर आकार दाखल करावा ह्मणजे मक्त्या पैकीं लागण केले नंबराचा लिलाव आकार कमीचे टिपणांतून कमी होऊन ज्यास्तींत नंबरचा भर आकार ज्यास्ती दाखल होईल.

# अंक २४

## नमुनानंबर ८ गवतीजमीनीचें पत्रकयाविषयीं.

स० गवतीजमीनीचें पत्रककधीं तयार करावें?

ज० लावणीचे नंबर पुरे होतांच बाकी राहिले पडित नंबरांतील गवतांचा लिलाव करण्यासाठीं दरसाल फिरून हें पत्रक तयार करावें.

स० गांवांतील सर्व पडित नंबर नमुनानंबर ८ चे तेरजांत दाखल करावे कीं नाहींत?

ज० फक्त सरकारी पडीचे नंबर मात्र दाखल करावे, इनामी पडीचे नंबर दाखल करूं नयेत.

स० नमुना नंबर ८ यांत दाखल केलेले पडीचे नंबर असतील तितके गांवांत पडित नंबर पाहूं गेलें असतां सांपडतील कीं नाहींत? किंवा ज्यास्ती सांपडतील?

ज० फक्त सरकारी पडीचे मात्र दाखल होतील तेवढे सांपडून त्या शिवाय इनामी पडीचेही सांपडतील; परंतु नमुनानंबर ८ यांत दाखल केल्याप्रमा

णेंच सापडणार नाहींत.

स० अमुकमनुष्यानें अमुक पडितनंबर अमुकलिलाव आकारास कोणते तारखेस कबूल केलें असें कोठें समजेल?

ज० नमुनानंबर ८ चे तेरजास समजेल.

स० कोणी कूळ पडितनंबर लिलावांत घेईल तर पडितनंबराचे तेरजावर जामीन घ्यावा कीं नाहीं येविषयीं समजुतीचे कलमांत खुलासा काय लिहिला आहे?

ज० कुळाचे खात्यास जामीन घेतलेला असतोच, ह्मणून नंबर ८ चे नमुन्यांत जामीनगत दाखल करण्याची गरज नाहीं.

## अंक २९

### लावणीपडीचें पाहणीपत्रक नमुनानंबर ९ प्रकरणीं.

स० पाहणीपत्रक हा कागद कधीं व कसा तयार करावा?

ज० आकटंबर महिन्यांत ह्मणजे खरीप अखेर व रबी अव्वल अशादोहीं पिकांचे हंगामास नंबरवार फिरून नमुन्याप्रमाणें कागद तयार करावा.

स० पाहाणी खरड्यास नंबर एकरवार आकारदाखल केले असतात त्याची खातरी करून घेण्यास काय आधार आहे?

ज० शेतवार पत्रकावरून खातरी करून घ्यावी.

स० पाहाणीखडर्यास नंबरवार एकर दाखल असतात त्यांची बेरीज गांवचे रकब्यास मिळेल कीं नाहीं.?

ज० पाहाणीखडर्यांत कीर्द सार एकर असून रकब्यांत खराब्यासुद्धां जमीन असत्ये सबब मिळणार नाहीं.

स० पाहणी खडर्यांत ज्या नंबरास जितके एकर दाखल केले असतात त्या नंबरची जमीन मोजून पाहिली असतां एकर ज्यास्ती भरतात याचें कारण काय.?

ज० पाहणीखडर्यांत दाखल केलेले एकर ख

राब्याचीजमीन वजाजाऊन असतात सबब नंबरची जमीन अधिक असून पाहणी खड्यांतील कमी असते.

स० पाहणीखड्यास खरीप व रबीचें आणेवारी कसें दाखल करावें. ?

ज० शेत दृष्टीनें पाहून नंबरचे सोळा आणे कल्पून अजमासानें आणेवारी लावावी.

स० पाहणीखड्यास खरीप व रबीचे रुपये कशा वरून दाखल करावे ?

ज० खरीप रबीमिळून सोळा आण्यास जर नंबरचा आकार, तर खरीपास व रबीचे आण्यास किती अशीं दोन त्रैराशिकें करून खरीप रबीचे रुपये दाखल करावे.

स० जोडी इनामी नंबरास खरीप रबीचे रुपये दाखल केले असतील त्यांतून सरकारास येणेची जोडी त्याचे हिशास खरीप रबीचा किती आकार येई ल असें समजणें झाल्यास कशावरून समजावें. ?

ज० एकंदर नंबरचे आकारास अमुक रुपये जोडी तर खरीपाचे व रबीचे आकारास किती याप्रमा-

णें दोनत्रैराशिकें करून समजेल.

स० कुळवार खरीप रबीच्या बेरजा एकत्र निवडून काढिल्या असतां त्या कोठें मिळाव्या ?

ज० हप्त्याचे व सूल बाकीस खरीप रबीचे रुपये दाखल केले असतात त्या बेरजांस मिळतील.

स० अमुक नंबरचा वाहणारा किंवा हिःसेदार अमुक मनुष्य आहे असें खात्यांत पाहिल्यावांचून एके ठिकाणीं कोठें समजेल ?

ज० नमुना नंबर ९ यास दरएक नंबरास वाहणाराचें नांव असतें त्यावरून समजेल.

प्र० शेताचे बांध दुरुस्त किंवा नादुरुस्त आहेत हें कोठें समजेल ?

ज० पाहाणी खडर्यातील शेऱ्याचे कोष्ठकांत समजेल.

स० दखेरान औतीनें व कोयतीनें करील तर आकार घेणें तो कसा घ्यावा ?

ज० औतीनें केल्यास ज्याइन्द रुळींतील कलम १२ प्रमाणें जमीन मोजून तशी जमीन गांवांत असेल

त्या दरानें आकार घ्यावा, व कोयतीनें केली असल्यास दर कोयत्यास ६१२ प्रमाणें घेतला पाहिजे.

स० एक मनुष्य दोन गांवचीं कोयत्यानें जमीन करील तर तितके गांवीं त्याचे नांवाचीं खातीं घालावीं कीं कसें.?

ज० ज्या गांवीं तो राहात असेल त्या गांवचे पाटलानें इतर गांवचे अधिकाऱ्याचे दाखल्यावरून आपले गांवीं खातें घालावें, दुसरे गांवीं खातें घालूं नये.

स० एक मनुष्य दोन गांवीं कोयत्यानें लावणी करीत असले कारणानें एके गांवींच दोन गांवचे लागण जमीनीबद्दल खातें घालावयाचें त्यास त्या मनुष्याकडे १६८ दुणें ठरवावें कीं काय?

ज० माणशी ६१२ घ्यावयाचे या ठरावा करितां एक मनुष्यानें स्वतः किती गांवीं कोयत्यानें जमीन केली तत्रापि त्याजकडे ६१२च जमाबंदी ठरविली पाहिजे.

स० गांवांत जमीन लागण असून तिचा आकार त्या गांवचे जमाबंदींत कोठें ही दाखल नाहीं अशी

लागणजमीन कोणती ?

ज० एकमनुष्य दोनगांवी कोयत्यानें लावणीक रील तर एकेगांवींच खानें पडून दुसरे गांवचीज मीनें. त्यागांवी कोठें जमाबंदीत येतनाहीं हीच लागण जमीन समजावी.

स० खरीपरबीचीं मुख्य धान्यें कोणतीं ?

जबाब.

| खरीप. | | रबी. | |
|---|---|---|---|
| १ बाजरी. | १ जोंधळा.(शा | १ गहूं. | १ हरभरा. |
| १ कुलगा. | कूरबेरीज.) | १ शाळू. | १ वाटाणा. |
| १ ऊस. | १ पावटा. | १ करडई. | १ मसूर. |
| १ मटकी. | १ इरवड. | १ तूर. | १ तीळ. |
| १ भात. | १ अंबाडी. | १ जवस. | १ ताग. |
| १ वरी. | १ उडीद. | इत्यादि. | |
| १ नाचणी. | १ मूग. | | |
| इत्यादि. | | | |

येणेप्रमाणें मुख्य धान्यें असतात.

# अंक २६

## लावणीपत्रकनमुनानंबर १० याविषयीं.

स० कलेकटर किंवा असिष्टन्ट कलेकटर साहेब लोक कोणते कागदावरून जमाबंदी करितात.?

ज० लावणीपत्रकनमुनानंबर १० चे कागदावरून करितात.

स० नमुनानंबर १०चा कागद कशावरूनव केव्हां करितात याविषयीं समजुतीचे कलम कसें लिहिलें आहे?

ज० खतावणीवरूनज्यांतील त्या सदरात नमुन्यांतील कोष्ठक १९ पावेतों किंवा सायरबाब असल्यासज्यास्ती कोष्ठकें येतील तेथ पावेतों कुल करण्यानें लावणीची खात्री होतांच तयार करावा.

स० लावणीपत्रक तयार झाल्यावर उपावणीचा नंबर निघाल्यास कसें करावें.?

ज० लावणीपत्रकाचे बेरजेखालीं कुळाचें नाव लिहून बेरीज धरून घ्यावी.

स० नंबर १० तील ऐन सरकारीजमाबंदीचीबे

रीज कोठेकोठे मिळेल ?

ज० कीर्दीवरील जमाबंदीजमाखर्चांतील ऐन सरकारीस, त्याप्रमाणेंच सरकारखात्यांत, नमुनानंबर१२ यास, जमाबंदीगावबंदास ऐन सरकारीची बेरीज असत्ये तेथें, व सर सालचे वसूल बाकींत; येणेंप्रमाणें पांच ठिकाणीं समजेल. याशिवाय गांवची पावती व मौज्याचे खात्यासही समजेल.

स० लावणीपत्रकांतील लावणीचे आकाराची बेरीज. पाहणीखडर्यांतील लावणीचे नंबराचा आकार एकत्र जुळून पाहिला असतां त्यास मिळेल कीं नाहीं ?

ज० पाहणीखडर्यांतील लावणीनंबर निवडून काढिले तर त्यांत इनामीलावणीचे नंबर दाखल होतील आणि लावणीपत्रकांत फक्त सरकारीच लावणीचा आकार दाखल असतो सबब मिळणार नाहीं.

स० सरकारास यावयाची जोडी अमुक असें किती ठिकाणीं समजेल ?

ज० जेथें ऐन सरकारीजमाबंदी समजत्ये तितक्या ठिकाणीं समजेल.

(ऐनसरकारीजमाबंदीकितीठिकाणीसमजत्येहें मागेंच लिहिलेंआहे)

# अंक २७

## नमुनानंबर १७ व १३ याविषयीं

स० कीर्द, खतावणी, कुळाचीपावती, व नमुना नंबर १०।१२।२२ इतके कागदा शिवाय कुळाकडे साल मजकूरची कितीजमाबंदी येणें आहे असें कोणत्ये कागदांत समजेल ?

ज० नंबर ११ चे जामीनपत्रकास कुळाचा जामीन घेतला असतो तेथें त्यासांलील सालमजकूर जमाबंदीची बेरीज दाखल केली असते त्यावरून समजेल.

स० कोणीं कूळ परागंदावगैरे झालेकारणानें त्याजकडे सालमजकूरची जमाबंदी अदल बाकी येणें थकली तर ती कोणापासून घ्यावी आणि तो कोणता मनुष्य आहे असें कोणत्ये कागदांत समजेल ?

ज० जामीनपत्रक नंबर ११ चे कागदांत जामीन कोण हें समजेल त्याजपासून सदरहू बाकी घ्यावी.

स० जामीनपत्रकावरून नादार झाले कुबाचे जा- मिनास बोलावून आगून बाकी देण्या विषयीं समजदे तां तो जामीन नाकबूल गेल्यातर तूंच जामीनकी घात लीस असा त्यावर पुरावा करण्यास नंबर ११चे काग दावरून कसा मार्ग आहे?

ज० जामीनपत्रकांत जामिनानें जामीनकी नमुद क रितांच साक्षीदार यांच्या साक्षी असतात त्यावरून पु रावा करावा.

स० नंबर वाढून गेलेला भर आकारास आणण्या करितां दरसाल अमुकरुपयेसूट अगर इस्तावा दिला असें कोठें समजेल, नंबरलावणीस असून तक्कार पडलेली आहे.

ज० नमुना नंबर १३चे कागदांत समजेल.

स० नंबर कबूल केला त्याशिवाय गैर हुकुमानें ज्यास्ती लावणी अमुक मनुष्यानें केली त्याचे तक्कारीचा तपशील कोणते कागदांत समजेल.?

ज० नमुनानंबर १३चे कागदांत समजेल.

स० नंबर १३च्या कागद कशाकरितां करावा लागतो?

ज० सूट देण्याबाबेवगैरे ज्या तक्रारी असतील तितक्या या नमुन्यांत दाखल कराव्या. जमाबंदीचा ठराव करतेवेळेस ठराव करणारास जाहीर कराव्या नंतर जो ठराव होईल त्याप्रमाणें सदरहू नमुन्यास शेरा मारून देवावा.

## अंक २८

## नमुना नंबर १४ कुळवार जमाबंदी-कमज्यास्तीपत्रकाविषयीं.

स० नमुना नंबर १४ चा कागद कोणते कागदावरून करावा.?

ज० बमोजी वगुदस्त बेरीज रवतावणी किंवा गुदस्तचा नंबर १४ चा नमुना यावरून लावावी; आणि नमुना नंबर ७ चे कमज्यास्ती टिपणावरून कमज्यास्ती करावें.

स० नमुना नंबर १४ यांतील कुळवार कमज्यास्ती

ची एकंदर बेरीज नमुना नंबर १५ यांतील कमज्या स्तीचे बेरजेस मिळते कीं नाहीं?

जं० मुबादल्याचे लावणीचा आकार नंबर १४ चे कमी वज्यास्तीकडील दिगरबाद सदरांत दाखल होतो तो वजाजातां बाकी बेरीज नंबर १५ चे कम ज्यास्तीस असते सबब मिळणार नाहीं.

स० नमुना नंबर १४ तील दिगरबाद सदरा ची बेरीज नमुना नंबर १५ यांतील कमज्यास्तींत को णते समजुतीनें आणीत नाहींत?

जं० एके कुळानें नंबर सोडून दुसऱ्यानें लावणी स घेतला यामुळें एकास बेरीज कमी पडून दुसऱ्या स ज्यास्ती झाली असें झाल्यानें सरकारी लावणी जमीन काईम असून कमज्यास्ती झालें नाहीं या सम जुतीनें नंबर १५ यांत आणीत नाहींत.

स० दिगरबाद ह्मणजे काय व त्या सदरांत को णती बेरीज दाखल होत्ये?

जं० दिगरबाद ह्मणजे मोबदला याबद्दल खुला सेवार उत्तर सदरील सवाल जबाबांत लिहिलें आहे.

स० नमुना नंबर १४ चे नमुन्यांत जितक्या कुळांस कमज्यास्ती झालें तीं व कमज्यास्ती न झालें तीं, कुळें सर्व दाखल करावीं कीं काय.?

ज० ज्यांस कमज्यास्ती झालें असेल तितकींच कुळें दाखल करावीं, कमज्यास्ती न झालें कुळांची एक बेरजेनें ताळ्याकरितां रकम दाखल करावी.

स० नमुना नंबर १४ चे तपशिलांत कमज्यास्तीचीं कुळें दाखल करावीं तीं कोणकोणतीं करावीं, हें समजण्यास कोणता कागद आहे.?

ज० नमुना नंबर ७ चें कमज्यास्ती टिपण आहे.

# अंक २९

## सरसालचा जमाबंदी ठरावबंद या विषयीं.

स० जमाबंदी ठरावबंद करण्यास किती कागद पाहिजेत व कोणकोणत्ये कागदांचा कोणकोणत्ये ठिकाणीं तपशील दाखविण्यास उपयोग पडतो.?

## जबाब.

| | | शेरा. |
|---|---|---|
| १ | मौजे, मजरे, माणसें वगैरे समजण्यास खानेसुमारी घातली का. | दरसाल नवीन केला पाहिजे. |
| १ | तनखा व कमाल वगैरे तपशिलास. | गुदस्त चिठ्ठा. |
| १ | जमीनीस पीक कोणत्ये हंगामास किती हें लिहिण्यास. | पाहाणी खर्डा. |
| १ | रकबा व खराब वगैरे तपशिलास व जिरायत बागायत वगैरे नंबरचे तपशिलास. | गुदस्त चिठ्ठा व जमीन नवीन आली असल्यास अमरसंकर कमज्यास्ती झाल्यास शेतवारपत्रक पाहिजे. |
| १ | इनाम दाखविण्यास. | गुदस्त चिठ्ठा. |
| १ | इनाम कमज्यास्ती झाल्यानंतर. | शेतवारपत्रक. |

| | | |
|---|---|---|
| १ | सरकारखालसाजमीनीपैकींपडितनंबरएकरआकारदाखवविण्यास. | नमुनानंबर८ वा. |
| १ | सरकारीजमाबंदीदाखविण्यास. | लावणीपत्रक. |
| १ | सरकारखालसाजमीनीसकमज्यास्तीदाखवविण्यास. | नमुनानंबर १४ |

येणेप्रमाणें कागद घेऊन चिठ्ठा तयार करावा.

स० घरें, माणसें, नांगर, गाड्या वगैरे किती असें कोठें समजेल.?

ज० जमाबंदी चिठ्यांतील आरंभी खानेसुमारीचा तपशील असतो तेथें समजतें.

स० झुंडाठरलेल्या विहिरी किती असें कोठें समजेल.?

ज० चिठ्यांतील खानेसुमारीच्या तपशिलांत समजेल.

स० गांवीं कुळें किती आहेत असें खतावणीशिवाय कोठें समजेल ?

ज० जमाबंदी चिठ्यांतील खाने सुमारीचे नपशिलांत कुळें समजतील.

स० इंग्रजी राज्य झाल्यापासून व पूर्वीपासून गांवचा कमाल आकार किती होत आला असें कोठें समजेल ?

ज० जमाबंदी ठराव बंदास समजेल.

स० एकंदर कुळ रकबा, पैकीं वजा खराब, व जिराईत बागाईत वगैरे नपशील कोठें समजतो आणि त्या बेरजा कोठें मिळतील ?

ज० चिठ्यांत समजतो व सदर कुबेरजा रोतवार पत्रकांत मिळतील.

स० जिराईत आकार कनिष्ठ कोणता व उत्तम कोणता हें चिठ्यांत समजतें कीं नाहीं ?

ज० कीर्दसार जमीनींतील जिराईत, बागाईत, तरी, यास उत्तम कनिष्ठ दर लावण्याची बहिवाट आहे तेथें समजेल.

स० सालमजकूरीं कोणतें हंगामाचें पीक किती आणे हें कोठें समजेल ?

ज० जमाबंदीचिठ्यांत समजेल.

स० जमाबंदीचिठ्यांत पिकांची आणेवारी कशावरून लावावी ?

ज० गांवचे दरएक नंबरांतील प्रत्येक धान्याची आणेवारी पाहाणीखडर्यांत लिहिली असते त्या सर्व नंबरांतील आणेवारीचें धान्यवार बेरीज करून त्या एकुणबार बेरजाचे आण्याचे बेरजेस जर, अमुक धान्याचें एकंदर अमुक आणे, तर १६ आण्यांस काय ? याप्रमाणें गांवांत जितकीं धान्यें असतील तितक्यांचीं त्रैराशिकें पृथक् पृथक् करून आणेवारी लावावी.

स० मदरीं लिहिलेल्या उत्तराचें स्पष्टीकरण उदाहरणानें दाखवावें.

# जबाब.

## तेरीज धान्याबद्दल.

| शेतनंबर. | खरीप. | | | | रब्बी. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भात | बाजी | इतरधान्यें | एकूण. | गहूं | हरबरा. | इतरधान्यें | एकूण |
| १ | ६४ | ६२ | ६३ | ६९ | ६५ | ६१ | ६१ | ६७ |
| २ | ६२ | ६३ | ६३ | ६८ | ६३ | ६२ | ६३ | ६८ |
| याप्रमाणें इतुनं खर्ची केली. | ६४०० | ६२०० | ६१५० | ६७५० | ६५०० | ६३२५ | ६२५ | ६८५० |
| एकंदर. | ६४०६ | ६२०५ | ६१५६ | ६७६७ | ६५०८ | ६३२८ | ६२५ | ६८६५ |

एकूण ६१६३२

| आणे. | भाताचे आणे. | गावचे आणे. |
|---|---|---|
| ६१६३२: | ६४०६ | ६१६: |

इत्यादी त्रैराशिकें करावीं.

**स०** एकंदर जमीनीचे तपशिलांत इनाम वजा केलें आहे तितकी बेरीज चिठ्याचे अखेरीस इनामाचा खर्च दाखविलेला असतो त्यास मिळेल कीं नाहीं.?

**ज०** जमीनींत वजा केले इनामांत जोडी इनामाचे नंबराचा भर आकार वजा असून इनामखर्चांत जोडी तेवढीच खर्च असते व पांढरगणा वगैरे इनामखर्चांत असून ते जमीनींत वजा दिलेले इनामांत नसतें सबब मिळणार नाहीं.

**स०** जमीनींत वजा दिलेले इनामाची आणि इसमवार खात्यांतील खर्च पडलेले इनामाची बेरीज बरोबर मिळत नाहीं याचें कारण काय असावें.?

**ज०** सदरीं लिहिलेले जबाबावरून समजावें.

**स०** कोणते एका इनामी नंबराचा आकार जमीनीचे तपशिलांत वजा दिला तितकी बेरीज इनामखर्चांत नसून कमी असल्ये याचें कारण काय.?

**ज०** [illegible] नंबर असल्यास असें होईल.

**स०** चिठ्यांत [illegible] किती ठिकाणीं समजतें, त्या सर्वर कमा बरो[illegible] असतात की काय.?

ज० प्रथम जमीनींत वजा केलें तेथें व इनामखर्चींत व अखेरीस तपशिलांत येणेंप्रमाणें इनाम तीन ठिकाणीं समजतें, इनामखर्च तपशीलवार दाखविला असतो तो व अखेरची इनामाची बेरीज बरोबर असून जमीनींत वजा केलें इनामाची भिन्न असते.

स० चिठ्यांत ऐनसरकारीजमीनींत पड वजा दिली असल्ये तिजकडे नमुना नंबर ८ यास मिळते की नाहीं?

ज० पडिल नंबर, नमुना नंबर ८ यास दाखल झाल्यानंतर मक्तेदार त्याची लावणी करील, तर तो नंबर पडीचे तेरजांत राहून चिठ्यांत लावणींत जातो तेणें करून पडीची बेरीज कमी पडल्ये सबब मिळणार नाहीं, परंतु नंबर ८ यास पडीपैकीं लावणी केलेले नंबर वजा दाखवून द्यावे ह्मणजे चिठ्यास मेळ बरोबर राहील.

स० ऐनसरकारीजमीनींत पड वजा आलीं त्यांची लावणी निघल्ये ती बेरीज लावणीपत्रकांतील ऐन लावणीस मिळेल कीं नाहीं?

ज० इस्लाचा किंवा कौली जमीन असल्यास तिचा आकार येईल त्याप्रमाणें लावणीपत्रकासदाखल होऊन चिठ्यांत भर आकार असतो सबब मिळणार नाहीं परंतु सदरीं लिहिलेल्या बेरजेंत इस्लावा वजा दिला ह्मणजे लावणीपत्रकास मिळेल, आणि यास्तवच चिठ्यांत इस्लाचा वजा देतात.

स० एक इनामदाराकडे दोनच्यार नंबर इनामी असतील तर ते कोणते किती एकर आकाराचे असें कोठें समजेल कीं नाहीं?

ज० चिठ्यांत त्या इसमाचे पोटीं नंबरवार तपशील दाखविला असतो तेथें समजेल, तो तपशील दोनसालां आड दाखवितात अशी बहिवाट आहे.

## तात्पर्य, जमाबंदी चिठ्यांत सर्व गावचा आहवाल समजतो.

# अंक ३०

## नमुनानंबर १६ याविषयीं.

स० कोणत्ये कुळाचा कोणत्ये कारणानें किती माल जप्त झाला असें कोणत्ये ठिकाणीं समजेल?

ज० नमुनानंबर १६ यांत समजेल.

# अंक ३१

## नमुनेनंबर १७।१८।१९ याविषयीं.

सदरहू नमुन्यांत विचारण्यासारखे काहीएक सवाल नसून नमुने पाहूनच समजूत होईल सबब सवालजबाब लिहिले नाहींत.

# अंक ३२

# तेरीज, गावचे बावीस नमुन्यांपैकीं कोणते नमुने कोठे राहावयाचे, त्याजबद्दल.

| नमुनानंबर | नमुन्याचें नांव | गांवींराहण्याचा | तालुक्यास देण्याचा | हुजूर जावयाचा | कुळापाशीं राहण्याचा |
|---|---|---|---|---|---|
| १ | खातेवार पत्रक | १ | १ | ० | ० |
| २ | रोजकीर्द | १ | ० | ० | ० |
| ३ | खतावणी | १ | ० | ० | ० |
| ४ | कुळाची पावती | ० | ० | ० | १ |
| ५ | सालवार बाकीचें वसूल पत्रक | १ | १ | ० | ० |
| ६ | तगाई बाकीचें वसूलबाकी पत्रक | १ | १ | ० | ० |
| ७ | लावणी कमज्यास्तीचें टिपण | १ | १ | ० | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | गवतीजमीनीचे चक. | १ | १ | ० | ० |
| ९ | पाहणी खर्डा. | १ | १ | १ | ० |
| १० | लावणीपत्रक | १ | १ | ० | ० |
| ११ | जामीनपत्रक | १ | १ | ० | ० |
| १२ | मालमजकूरच्यांची वसूल बाकी. | १ | १ | ० | ० |
| १३ | लावणीकमज्यास्तीतील तकारीची केफियत. | १ | १ | ० | ० |
| १४ | कुळवारजमा [illegible] ज्या [illegible]. | १ | १ | १ | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५ | सरसालचा ठराव बंद. | १ | १ | १ | ० |
| १६ | पीकजमीनीची नोंद. | १ | ० | ० | ० |
| १७ | रपोट लिहिण्याचा नमुना सवब दाखल बाद. | ० | ० | ० | ० |
| १८ | जावक बारनिशी. | १ | ० | ० | ० |
| १९ | आले कागदांचें फेरिस्त. | १ | ० | ० | ० |
| २० | गांव खर्चसंबंधीं जिन्नस घेतल्याची नोंद. | | ० | ० | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २१ | गांवखरखर्चीचीपावती. | ३ | ० | ० | ० |
| २२ | गतसालचीवसूलबाकी- | १ | १ | ० | ० |
| | | २० | १३ | ३ | १ |

मुलकीप्रकरणीसमास-

# शुद्धीपत्र.

| पत्र | ओळ | अशुद्ध पडलें आहे तें. | शुद्ध एकसें कोठें असावें तें. |
|---|---|---|---|
| १२ | १८ | तगाई हप्ता भरण्यास्तव बाकी राहिलीती. | तगाई हप्ता भरण्यास्तव बाकी राहिली तीयेणें. |
| १३ | १६ | कारण तेथें शिळक राहा न नाहीं. | कारण तेथें साल अखेरीस शिलक राहात नाहीं. |
| १६ | ११ | एकंदर निवडून काढिल्या. | एकंदर निवडून काढिल्या. |
| १६ | १८ | कुळकरण्यार विचालें. | कुळकरण्यास विचारिलें. |
| १७ | १८ | त्या रकमेची बेरीज. | त्या वसुलाचे रकमेची बेरीज. |
| १८ | ४ | वाटेंत आहे. | वाटेंत आहे असें समजावें. |
| २६ | ९ | ठाण्यास असतां वसूल पडतोतो. | ठाण्यास असतां वसूल पटतो तो. |
| ३३ | १५ | खर्च लिहून दुसरे खा त्यास जमा करावे. | खर्च लिहून वाजवीजमा होण्याचे खात्यास जमा करावे. |
| ३२ | ८ | प्रथम करावा. | हा प्रथम करावा. |
| ३४ | १८ | यकंदर. | एकंदर. |
| ३६ | ५ | वतनदारास. | वतनदारांस. |
| ४० | १ | त्यान्चा उपयोग. | त्यांन्चा उपयोग. |
| ४६ | २ | जबाब (असाशब्द मुळीच लिहिला नाहीं. | जबाब (असें पाहिजे.) |

| | | | |
|---|---|---|---|
| ४७ | ० | खगांवचे खानगीखा त्यांचीबेरीज ७५ दिली | ती ५० पाहिजे. |
| ४८ | १० | कुळांचीं खातीं. | कुळांचीं खातीं. |
| ५५ | ८ | बारमाहीतेरीज. | खतावणीनें बारमाही तेरीज. |
| | १५ | कुळवार वसूल. | फक्त कुळवार. |
| ५६ | १२ | यांत कुळवार एकंदर. | यांत कुळवार व एकंदर. |
| | १७ | लित क्याचे खात्यांत. | तिनक्यांचे खात्यांत. |
| ५७ | ५ | नंबराच्या. | नंबरांचा. |
| | १५ | एकाच खात्यांत. | एकाचे खात्यांत. |
| ६० | १२ | नंबरचा आकार. | नंबरांचा आकार. |
| ६२ | २ | लिहिल्याप्रमाणे होईल. | लिहिल्याप्रमाणें होईल म्हणजे कुळाचे खात्यांत तगाईचें येणें व फाजिला बद्दल देणें असें कारणपरत्वें निघाल्यास होईल. |
| ६३ | ११ | ठाण्यास पावता झाला. | ठाण्यास पावता झाला नाहीं. |
| ६४ | १० | तालुक्याती शिलक. | तालुक्यास ती शिलक. |
| ७६ | १२ | नमुनानंबर ५।६।१२ | नमुनेनंबर ५।६।१२ |
| ७८ | ४ | वमुलामेळ. | वसुलाचा मेळ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८५ | ३ | नमुम्यात.…… | नमुन्यांत.…… |
| १०४ | ११ | दुरुस्तकरण्यास-घालवाव्या.…… | दुरुस्तकरवाव्या किंवा घा-लवाव्या. |
| १०६ | १५ | जमीनीविषयींसो-ळाकलमाचाकायदा | जमीनीविषयींएकोणीसक-लमाचाकायदा. |
| ११५ | १७ | ताब्यांततालुके. | ताब्यांतजेतालुके. |
| १३१ | ४ | जमीनी. | जमीन. |
| १३३ | ९ | नंबराचा आकार. | नंबरांचा आकार. |
| १३४ | २ | नमुनानंबर १७व१३ याविषयीं.…… | नमुनेनंबर ११ व १२ यावि-षयीं.…… |

# शब्दपरिभाषा.

आदावा— ज्यांत देणें घेणें समजतें तो.
अमानत— अनामत; निकाल न झालेली रकम ती.
आकारणी— आकार.
इनाम तिजाई— इनाम आकाराचा तिसरा हिस्सा सरकार घेणें ती.
इरसाल— ऐवजाचा भरणा गांवाहून तालुक्यास किंवा तालुक्याहून हुजुरास होतो तो.
इरसालपट्टी— भरणे पावती; रिपोर्ट.
ऐन काळी— लागण जमीन अथवा तिचा आकार.
ऐनजमा— काळीचा वसूल किंवा रोख वसूल ती.
ऐन हिशेबी— जमाखर्ची नव्हे ती; रोख.
कमाल आकार— एकंदर आकार.
काईमठराव— धरसोडीचा आकार.
काळी— साऱ्याचा ठराव जिचा झाला ती जमीन.
कीर्द— जमाखर्चाची दररोजची वही.
कीर्दसारजमीन— लावणी लायक जमीन.
कुळकरबा— एकंदर जमीन.
खोली— भर आकाराची जमीन असून खराब झाली असतां कांहीं मुदतपर्यंत कमी आकारानें देतात ती.

खट बाकी— नयेण्यालायकबाकी.
खतावणी— कीर्दीचे मेळाची खाते वार वही.
खानेसुमारी— मनुष्ये, गाड्या, घरें वगैरेची मोजदाद.
खालसा— सरकारी.
गतकुळी— सरकारीजमीन असून मिराशी न व्हेती.
गायरान— गांवांतील गुरें चरण्याची जमीन.
गांवठाण— गांवचे वसाहतीची जागा.
गोषवारा— तात्पर्य; सारांश.
चिठ्ठा— ठरावबंद. (नमुना नंबर १५ चा.)
जमाखर्ची— रोखन सून हिशेबाची रक्कम ती.
जमाबंदी— गांवचा वसुलाचा ठराव.
जमीदार— पाटीलदेशमुखवगैरे वतनदार नौकरलोक.
जिराईत— पावसानें पीक होणारी जमीन.
तकरार किंवा तक्रार— चुकी.
तगाई— शेतकीसामानासाठीं कुळास सरकारकर्ज देतें ती.
तनखा— मोगलाई तोलकमाल आकार.
तरी— भातजमीन.
तीनसाला इनामपट्टी— इनामाचा भर आकार दोनसालें

लकास मिळून तिसरे सालचा सवअ.

दखेरान— डोंगरी लागण जमीन.

दिगरबाद— लावणी नंबर मोबदला; चढणे नाहती.

नगदी— रोख; ऐन; हिशेबी.

नंबर— अंक, शेत.

पडीत— लागण नव्हती.

परंपोक— नंबरपैकीं पोट खराब जमीन ती.

परभारे इनाम— हकदारांस गांवांतून मिळतें तें.

पानडरगणा— गांवांतून पाटलास पानसुपारी बदल मिळतो ते

फाळणी— वांटणी.

फेरिस्त— पुडक्यांत किंवा रुमालांत किती कागद आहे एका कागदावर टांचतात ते.

बागाईत— विहिरीचे व पाटाचे पाण्यावर पिकणारी ज

बोटखत— खातेवार टांचण.

मजरे— गांवची वाडी.

महसुली भत्ता— मुलकी वसूल करण्याकरितां गादरशिपाई लावतात भत्ता तो.

रव ...न्चीन.
...राबी — मिरासदार जमीन वाहतोतो.
मिरासदार — सरकारी जमीन वंशपरंपरा सारा भरू
न वाहतोतो.
रकबा — जमीन.
...ग — सदर नसल्यास पूज्य घालून लिहिणें.
लागण — लागवड.
सदर — जमाखर्चांतील स्थानें.
सादिलवार — दप्तर वगैरे किरकोळ खर्चाची ने-
मणूक.
सायरबाब — जमीनी शिवाय इतर उत्पन्न,ती.
सालवार बाकी — मागील बाकी.
सुमारी — केली व वजनी यांखेरीज पदार्थांची सं-
ख्यानुक्रमानें गणती.
...टु — जमाबंदी पैकीं माफ केलेला पैसा.
...स्ती — भरपूरानें जमीन चालली.
...ला — विहिरीवर ... दिलेला सारा.

तोव